सत्यमेव जयते

रोजगार हमी योजना समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

तिसरा अहवाल

(नाशिक जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
२०१६.

रोजगार हमी योजना समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

तिसरा अहवाल

(नाशिक जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती

(सन २०१५-२०१६)

कार्यकारी समिती प्रमुख

(१) * श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(३) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.
(४) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(५) * रिक्त
(६) * * रिक्त
(७) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(८) श्री. संतोष दानवे, वि.स.स.
(९) श्री. संदिपानराव भुमरे, वि.स.स.
(१०) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. नारायण पाटील, वि.स.स.
(१२) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स.
(१३) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स
(१४) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१५) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(१६) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(१८) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.
(१९) ॲड. राहूल कुल, वि.स.स.
(२०) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(२१) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.
(२४) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.
(२५) * * * रिक्त

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, सह सचिव (२),
(३) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (सचिव).
(४) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

---

* श्री. जयकुमार रावल, वि.स.स. तथा समिती प्रमुख यांचा मंत्रिमंडळात मा. मंत्री म्हणून समावेश झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागी श्री. प्रशांत बंब, वि.स.स. तथा समिती सदस्य यांची 'कार्यकारी समिती प्रमुख' म्हणून मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी नियुक्ती केली आहे.

**श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. तथा समिती सदस्य यांचा मंत्रिमंडळात मा. मंत्री म्हणून समावेश झाल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

***श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांची दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी विधानपरिषद सदस्यांची मुदत संपुष्टात आल्याने सदर जागा रिक्त आहे.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती

(सन २०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(३) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.
(४) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(५) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.
(६) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(८) श्री. संतोष दानवे, वि.स.स.
(९) श्री. संदिपानराव भुमरे, वि.स.स.
(१०) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. नारायण पाटील, वि.स.स.
(१२) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स.
(१३) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स
(१४) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१५) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(१६) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. शिवेंद्रसिंह भोसले,वि.स.स.
(१८) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.
(१९) ॲड. राहूल कुल, वि.स.स.
(२०) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(२१) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
(२२) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(२३) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२४) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.
(२५) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, सह सचिव (२),
(३) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव,
(४) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती

(सन २०१३-२०१४)

समिती प्रमुख

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री. भाऊराव पाटील, वि.स.स.
(६) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(१२) प्रा. लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.
(१३) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१४) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स
(१५) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(१६) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
(१८) कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
(२०) श्री. धैर्यशील पाटील, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
(२४) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स.
(२६) प्रा. अतुल देशकर, वि.स.स. (निमंत्रित)
(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, उप सचिव,
(३) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती),
(४) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना :	(नऊ)
१.	कामाचे वार्षिक नियोजन	१
२.	मजुरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च	८
३.	मजुरांची नोंदणी व किमान मजुरी	१०
४.	महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेले अपघात . .	१२
५.	अपूर्ण कामे	१३
६.	विहीर कार्यक्रम	१७
७.	गैरव्यवहाराची प्रकरणे	१८
	परिशिष्टे :	
	(एक) - कामाचे वार्षिक नियोजन	२३
	(दोन) - मजुरांच्या सोयी सवलतींवर करण्यात आलेला खर्च	४१
	(तीन) - अपूर्ण कामे	४९
	(चार) - गैरव्यवहाराची प्रकरणे	६७
	(पाच) - बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त	८१

प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना समितीचा " कार्यकारी समिती प्रमुख " या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा तिसरा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ व २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांद्वारे सन २०१३-२०१४ या वर्षासाठी समिती गठीत केली. सदरहू समितीने दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१४ रोजी नाशिक येथे जिल्हा बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणा-या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणा-या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

जिल्हा बैठकींमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करुन ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल समितीचे सर्व सदस्य,नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नाशिक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरुन समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने सदर अहवाल दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी विचारात घेतला व संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक ८ डिसेंबर, २०१६.

प्रशांत बंब,
कार्यकारी समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

रोजगार हमी योजना समितीचा अहवाल

(नाशिक जिल्हा)

(१) कामाचे वार्षिक नियोजन :

रोजगार हमी योजना समितीने दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१४ रोजी नाशिक येथे जिल्हा बैठक आयोजित केल्या होत्या. बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील " कामाचे वार्षिक नियोजन " या संबंधात समितीने विचारणा केली की, सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता कशा प्रकारे नियोजन करण्यात आले आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जलसिंचन व जलसंधारणाची २३० जुनी व सेल्फवर ८४१, नवीन १८२४ अशी एकूण २८९५ कामे सन २०१४-२०१५ मध्ये प्रस्तावित केली आहेत. जिल्हयात मजुरांची उपलब्धता कमी प्रमाणात आहे. त्यामुळे जलसंधारणाची कामे यंत्रणांकडून झालेली नाही. त्यासाठी वारंवार " काम मागो अभियान " या सारखे प्रबोधनपर कार्यक्रम घेतले जातात. यंत्रणांनी केलेल्या मागणीनुसार वार्षिक आराखडा तयार केला जातो. गावपातळीवरील कामांसंदर्भात ग्रामपंचायतीमध्ये ठराव करुन जिल्हा परिषदेकडे कामाचे प्रस्ताव पाठविले जातात. त्यानंतर ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येतात. त्या आधारे कामांचे नियोजन केले जाते. परंतु कामे झाली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली, जॉबकार्ड दिलेले मजूर किती होते, जॉबकार्ड देऊनही मजूर कामावर येत नाहीत अशा मजुरांची संख्या किती आहे. तसेच मजूर कामावर येत नसतील तर कामे प्रस्तावित का केली तसेच रोहयोची कामे प्रस्तावित करण्यासाठी निकष काय आहेत. त्यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) यांनी सांगितले की, सन २०१४-१५ वर्षासाठी २.६९ लाख रुपये किंमतीचे ७० कामांचे नियोजन केलेले आहे तसेच ग्रामपंचायतीमध्ये आराखडा तयार झाल्यानंतर तो जिल्हा परिषदेकडे येतो. सदरचा आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविण्यात आल्यानंतर यंत्रणास्तरावर कामे घेण्यात येतात.

एखादी यंत्रणा १०-१५ पट वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करीत असेल तर त्यासाठी कोणते निकष अवलंबण्यात येतात. सेल्फवरील २-३ हजार मंजूर केलेल्या कामांचा जिल्हाधिकारी यांच्याकडून आढावा घेतला जातो का तसेच मागील काळातील २३० अपूर्ण कामे कशाच्या आधारावर प्रस्तावित केली आहेत, ती कामे केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे. त्या कामासाठी मजुरांना जॉबकार्ड दिले होते काय अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, यासंदर्भात घेण्यात आलेल्या बैठकीत अपूर्ण कामांपैकी जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्यासाठी वारंवार यंत्रणाकडे पाठपुरावा केलेला असून बहुतांश कामे ग्रामपंचायतींकडून सुचविली जातात. त्या कामांना ग्रामसभेची मंजुरी घेतल्यानंतर जिल्हा परिषदेमार्फत आराखडा सादर केला जातो. ती कामे कमी करण्याचा अधिकार जिल्हा स्तरावरील अधिका-यांना नाही. त्यामुळे शेल्फवरील कामांची संख्या जास्त दिसते.

अपूर्ण असलेल्या कामांसाठी शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर तो खर्च होत नाही. त्यामुळे संपूर्ण जिल्हयातील कामांचे नियोजन बिघडून जाते असे समितीने निदर्शनास आणले असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, मागील ४ वर्षाचा वार्षिक नियोजन आराखडा अवास्तव असल्याचे रोजगार हमी योजना कक्षातून यंत्रणांना सांगण्यात आले आहे. ग्रामपंचायतीने पाठविलेल्या कामांचा आराखडा जिल्हा परिषदेमार्फत ठराव मंजूर करुन पाठविला असला तरी तो अवास्तव असल्याने जिल्हा परिषदेने अवास्तव आराखडे मंजूर करुन पाठविण्यास येऊ नये याकरिता जिल्हा परिषदेच्या अधिका-यांना सुधारणा करण्याचे अधिकार असले पाहिजे. ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायतींना पंचायत समितीकडून तसेच ग्रामसभेत लोकांकडून सूचना स्विकारल्या जातात. अनेकदा ग्रामसभेकडून रस्त्याची, जलसंधारणाच्या कामाची मागणी येते, पण प्रत्यक्षात मंजूर केलेल्या कामांवर मजूर उपलब्ध होऊ शकतात काय, जॉब कार्ड असलेली किती मजूर आहेत याचा विचार केला जात नाही. त्यामुळे वार्षिक आराखडा व मागणी यामध्ये विसंगती दिसून येते. जी कामे अपूर्ण आहेत त्यापैकी जी कामे पूर्ण होण्यासारखी आहेत त्याचा आढावा घेण्यात

येतो. त्यावर समितीने विचारणा केली की, सन २०१४-१५ या वर्षासाठी कामे प्रस्तावित करताना मागील ३ वर्षाचे नियोजन का करण्यात आले नाही त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मागील ४ वर्षाच्या आराखडयाचे निरीक्षण केले असता जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात गृहित धरलेली आहेत. परंतु यंत्रणेकडून तेवढी कामे झालेली नाहीत. मजुरांची मागणी नसल्यामुळे ती कामे झालेली नाहीत. ग्रामपंचायतीने सुचविलेल्या कामांना जिल्हा परिषदेने मंजुरी दिल्यानंतर ती कामे केवळ ग्रामपंचायतीची राहत नाहीत तर संपूर्ण यंत्रणांसाठी असतात. त्यामुळे सर्व यंत्रणांनी ती कामे पूर्ण करणे अपेक्षित आहे. तसेच जिल्हा स्तरावरील यंत्रणांनी स्वतःहून कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. जनतेकडून कामांची मागणी येण्यापेक्षा यंत्रणेच्या अधिका-यांनी स्वतःहून जनतेकडे मागणी नोंदविणे आवश्यक आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून " काम मागवा अभियान " राबविण्यात आले. त्यासाठी केंद्र शासनाच्या स्वयंसेवी संस्थेकडून मदत घेतली आहे. तथापि, या ठिकाणी मजुरांकडून कामाची मागणी आलेली नाही.

जिल्हयातील ३-४ यंत्रणाचा अपवाद वगळता उर्वरित कोणत्याही यंत्रणांनी मागील ४ वर्षात कोणतेही काम केलेले नसल्याचे समितीस निदर्शनास आले आहे. जॉब कार्ड दिल्याचे केवळ कागदावरच दाखविलेले असून प्रत्यक्षात कामे झालेली नाहीत. तसेच सन २०१४-१५ या वर्षाचा आराखडा तयार करीत असताना सन २०१३-१४ या वर्षातील कामे पूर्ण न झाल्यामुळे निधी अखर्चित राहिला आहे. रोपवाटिकेची १४०, वृक्ष लागवडीची १६९१ व वृक्ष संगोपनाची ८ कामे प्रस्तावित केली आहेत. गावक-यांनी त्यांना मजुरी वेळेवर मिळत नसल्यामुळे ते कामाची मागणी करीत नाही असे समितीला सांगण्यात आले आहे. मजुरांना वेळेवर मजुरी मिळाली तर मजूर काम करण्यास तयार आहेत. परंतु यासाठी वन विभागाने कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. वन विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जात नाहीत हे मुख्य कारण असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता त्याबाबत उप वनसंरक्षक (पूर्व विभाग) यांनी खुलासा करताना सांगितले की, सन २०१४-१५ या वर्षासाठी ४ लाख ६३ हजार रोपे रोजगार हमी योजनेमार्फत तयार करण्यात येतील.

सन २०१४-१५ मध्ये १६९१ वृक्ष लागवडीची व संगोपनाची कामे गृहित धरली असून मौजे काचणे येथील कामाला ३५ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना वन विभागाने मागील ३ वर्षात केवळ २२ हजार रुपयांचे काम केलेले आहे तसेच रोपवाटिकेची १४० व वृक्ष लागवडीची १६९१ व वृक्ष संगोपनाची ८ कामे प्रस्तावित केली आहेत असे समितीने निदर्शनास आणून विचारणा केली की, मागील ३ वर्षाच्या कालावधीत कामांवर खर्च झालेला नसताना नवीन कामे प्रस्तावित का करण्यात आली ? त्यावर उप वनसंरक्षक यांनी सांगितले की, वृक्ष लागवड व संगोपनाची कामे प्रस्तावित केली असून सदरहू कामे पूर्ण करण्यासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. तथापि, रोपवन वाटीका सुरु केलेल्या आहेत. उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी स्पष्टीकरण दिले की, संपूर्ण यंत्रणेचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आढावा घेतलेला आहे. १२६१ कामे अपूर्ण आहेत. परंतु भौतिकदृष्टया पूर्ण झालेल्या कामांसंदर्भात पूर्णत्वाचा दाखला न दिल्यामुळे अपूर्ण कामांची संख्या जास्त दिसत आहे.

राजीव गांधी भवन किती जिल्हयात बांधण्यात आले. माहितीतील परिशिष्ट क्र. " एक " वरील ५५५ कामे कोणकोणत्या ठिकाणी प्रस्तावित केली आहेत असे समितीने विचारले असता जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले की, ग्रामपंचायतीने कामांसंदर्भात ठराव केल्यानंतर जिल्हा परिषद ती कामे नियोजनामध्ये समाविष्ट करते व त्यासाठी लाखो रुपयांची तरतूद मंजूर करुन घेतली जाते. त्यासंदर्भात समितीने निदर्शनास आणून दिले की, माहितीमधील परिशिष्ट क्र. " एक " वर सन २०१०-११ ते २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील अखेरचा शिल्लक निधी दर्शविलेला असून दरवर्षी हा निधी वाढत गेलेला आहे. प्रशासनाने मात्र नियोजनाप्रमाणे कसलेही प्रयत्न केलेले दिसत नाहीत. त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, अपूर्ण कामांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. कामांचा ८८ ते ९३ टक्के आराखडा ग्रामपंचायत स्तरावर तयार केला जातो. यंत्रणेची अतिशय कमी कामे रखडली आहेत. जिल्हाधिका-यांनी सर्व यंत्रणाच्यावतीने समितीस आश्वास्त केले की, भविष्यकाळात योग्य ती नोंद घेऊन जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्यात येतील.

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आश्वासित केल्यानुसार समितीने प्रश्नावलीच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांची पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

❖ सन २००९-१० ते २०१३-१४ या वर्षाच्या नियोजनामध्ये प्रस्तावित केलेली कामे का घेण्यात आली नाही ?

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांचे मागणीप्रमाणे कामे सुरु करण्यात आलेली आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात आलेली कामे व त्यावर झालेला खर्च :-

वर्ष (१)	सुरु करण्यात आलेली कामे (२)	झालेला खर्च (३)	निर्माण झालेले मनुष्य दिवस (४)
२००९-१०	५५२	३०१.२६	३.३२
२०१०-११	४७७	६१५.९२	५.४७
२०११-१२	५४८०	४३३७.६२	१८.२०
२०१२-१३	६२६३	८९१४.८४	३७.७३
२०१३-१४	२०५८	४९४१.६५	१९.८४

❖ मागील ३ वर्षामध्ये विभागाने एकही काम केलेले नसतांना पुढील वर्षासाठी कशाच्या आधारावर नवीन कामे प्रस्तावित केली व कामे प्रस्तावित करण्यासाठी निकष काय आहेत?

- महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२००६/प्र.क्र.१८४/रोहयो-१०, दिनांक १९ ऑक्टोबर २००६ नुसार वार्षिक नियोजन आराखडा तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. स्थानिक मजुरांची कामांची मागणी असल्यास त्यांना तात्काळ काम उपलब्ध करुन देता यावे या उद्देशाने नविन कामे प्रस्तावित केली आहेत. नवीन कामांना ग्रामसभेची मान्यता घेण्यात आली आहे. ग्रामपंचायत स्तरावरील लोकांची कामाची अपेक्षित मागणी, काम मागणीचा अपेक्षित कालावधी विचारात घेऊन पुढील वर्षीच्या कामाचे नियोजन केले जाते.

❖ वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करीत असतांना कोणत्या निकषाचा अवलंब करतात सेल्फवर मंजूर करुन ठेवलेल्या २-३ हजार कामांचा अधिकारी आढावा घेतात का ?

- वार्षिक नियोजन आराखडा तयार करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील लोकांची मागणी आणि काम मागणीचा अपेक्षित कालावधी विचारात घेतला जातो. मग्रारोहयोअंतर्गत सेल्फवर असलेल्या कामांचा आढावा घेऊन त्यात मजुरांची कामांची मागणी असल्यास तात्काळ काम उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही केली जाते. सेल्फवरील मंजूर कामांचा अधिकारी यांचेकडून वेळोवेळी/मासिक बैठकीचे वेळी आढावा घेण्यात येतो. शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, २००६ रोजी दिलेल्या सूचनांनुसार वार्षिक नियोजन आराखडा तयार केला जातो.

❖ सन २०१४-१५ या वर्षाच्या आराखडयात त्रुटी असतांना ३ हजार नवीन कामे कशाच्या आधारावर केली व मागील काळातील २३० अपूर्ण कामे करण्यासाठी काय प्रयत्न करण्यात आले ?

- नियोजन आराखडयातील कामांना ग्रामसभेची मान्यता घेतल्यानंतर पंचायत समितीची मान्यता घेण्यात येऊन जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेची त्यास मान्यता घेण्यात येते. ग्रामसभेने सुचविलेली कामे कमी करण्याचा अधिकार जिल्हास्तरावरील अधिका-यांना नाही. मजुरीच्या मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन द्यावी लागतात. दुष्काळी परिस्थितीमध्ये मजुरांना कामे

उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान ५ कामे सेल्फवर ठेवण्याच्या शासनाच्या सूचना आहेत. त्यामुळे आराखडयामध्ये नविन कामे समाविष्ट करण्यात आली आहेत. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी बैठका घेऊन पाठपुरावा करण्यात येतो. सद्यस्थितीत जिल्हयामध्ये १२६१ कामांपैकी ९९६ कामे पूर्ण झाली असून २६५ कामे अपूर्ण आहेत. यंत्रणानिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहेः-

तपशील

अ.क्र. (१)	यंत्रणेचे नाव (२)	अपूर्ण कामांची संख्या (३)	३१ मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण कामांची संख्या (४)	सद्यस्थितीत अपूर्ण कामांची संख्या (५)
१.	विभागीय व्यवस्थापक वनप्रकल्प विभाग, पश्चिम भाग, नाशिक.	१८२	६०	१२२
२.	उपसंचालक, सामाजिक वनीकरण, नाशिक	२०	२०	००
३.	जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी	६८३	६६६	१७
४.	उपवनसंरक्षक, पूर्व भाग, नाशिक	८६	५८	२८
५.	उपवनसंरक्षक, पश्चिम भाग, नाशिक	८३	६२	२१
६.	उपविभागीय वनाधिकारी, मालेगांव	१०	१०	००
७.	कार्य.अभि.कडवा कालवा, नाशिक	०७	००	०७
८.	कार्य.अभि.मालेगांव पाटबंधारे विभाग	१०	१०	००
९.	कार्य.अभि.ल.पा.(स्था.स्तर) नाशिक	५०	४३	०७
१०.	कार्य.अभि.सा.बां.विभाग, नाशिक	१३	००	१३
११.	कार्य.अभि.सा.बां.विभाग, पूर्व नाशिक	२३	०६	१७
१२.	कार्य.अभि.सा.बां.विभाग,उत्तर नाशिक	०६	०६	००
१३.	कार्य.अभि.सा.बां.विभाग,मालेगांव	२८	०२	२६
१४.	कार्य.अभि.आदिवासी सा.बां.विभाग,कळवण	३५	२१	१४
१५.	कार्य.अभि.ल.पा.विभाग,नाशिक	११	११	००
१६.	कार्य.अभि.नांदुर मध्यमेश्वर प्रकल्प, नाशिक	१४	१४	००
	एकूण . .	१२६१	९९६	२६५

❖ जिल्हयातील ३-४ यंत्रणाचा अपवाद वगळता उर्वरीत कोणत्याही यंत्रणांनी मागील ४ वर्षात कोणतेही काम केलेले नाही याची कारणे काय?

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत किमान ५० टक्के कामांची अंमलबजावणी ग्रामपंचायत मार्फत करण्यात येते. त्यावर मोठया प्रमाणात मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो. ग्रामपंचायतीचे कामाव्यतीरिक्त जलसंधारण, वनीकरण, रस्ते, ई.कामे ही कृषि विभाग, वनीकरण सामाजिक वनीकरण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांमार्फत करण्यात येतात. ग्रामपंचायत तसेच उपरोक्त यंत्रणाद्वारे मजुरांना मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. त्यामुळे इतर शासकीय यंत्रणेमार्फत कामे करण्यात आलेली नाहीत.

❖ सन २०१४-१५ या वर्षाचा आराखडा तयार करीत असतांना सन २०१३-१४ या वर्षातील कामे पूर्ण न झाल्यामुळे किती निधी अखर्चित राहीला आहे ?

- सन २०१३-१४ मध्ये (ऑक्टोबर २०१३ अखेर) एकूण प्राप्त निधी ५३.१२ कोटी होता. त्यापैकी ऑक्टोबर २०१३ अखेर ३६.१५ कोटी खर्च झाला असून मार्च २०१४ मध्ये रु. ४९.८० कोटी खर्च झाला आहे. वार्षिक नियोजन आराखडयामध्ये अपूर्ण असलेली कामे पुढील वर्षामध्ये पूर्ण केली जातात. मजुरांचे मागणीप्रमाणे कामे उपलब्ध केली जातात. मजुरांची कामाची मागणी जास्त आल्यास जास्त खर्च होतो. मागणी कमी असल्यास कमी खर्च होतो. त्यामुळे निधी अखर्चित राहीला असे म्हणता येणार नाही.

❖ मौजे काचणे येथील कामाला ३५ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना आरएफओ यांनी मागील ३ वर्षात केवळ २२ हजार रुपयांचे काम केलेले आहे याची कारणे काय? नविन कामे का प्रस्तावित करण्यात आली नाही.

- उपवनसंरक्षक पुर्व भाग, नाशिक यांचे अधिनस्त वनविभागातील देवळा, रोहयो वनक्षेत्रातील मौजे काचणे येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कम्पार्टमेंट ३२१ कुप नं. १ मध्ये २०.०० हे. क्षेत्रात जल व मृद संधारणाची दगडी नालाबांध व सलग समपातळी चर खोदण्याची कामे प्रस्तावित करुन मंजूर करण्यात आलेली आहेत. प्रथम पत्र जा.क्र. ३५, दि.३०.०५.२०११ अन्वये तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली आहे, व पत्र क्रमांक म.ग्रा.रो.ह.यो./एस आर/८२/२०११ देवळा, दि. ३०.०५.२०११ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३,८६,८५५ इतकी असून सदर कामांस तहसिलदार कार्यालय, देवळा यांचेकडील पत्र जा.क्र. मग्रारोहयो/कावि/कार्यारंभ आदेश/३७९/२०११, दि. ४.०६.२०११ अन्वये कार्यरंभ आदेश प्राप्त झालेले आहेत. काचणे २०.०० हे. क्षेत्रात जल व मृद संधारणाचे दगडी नालाबांध व सलग समपातळी चर खोदण्याचे काम मंजूर झाल्याने दि. १८.०१.२०१२ रोजी नोंदणीकृत जॉबकार्डधारक मजुरांकडून काम सुरु करणेत आलेले होते.

शासकीय मजुरीच्या दरात वाढ झाल्याने सदरचे कामांस सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास पत्र क्र. १४, दि. २०.१०.२०१२ अन्वये तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली असून, प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश क्र. मग्रारोहयो/कावि/४०८/२०१२, देवळा, दि. २६.१०.२०१२ गट कार्यक्रम अधिकारी (मग्रारोहयो) तथा तहसिलदार, देवळा यांनी खालीलप्रमाणे एकूण ८ कामांना एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३५,४१,९३६ मंजुरी दिलेली आहे. कांचणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३५,४१,९३६ इतकी नसून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम केवळ रक्कम रु. ४,३३,३३६ इतकी आहे.

अ.क्र	यंत्रणेचे नाव	कामाचे नांव/ गावाचे नांव/ क्षेत्र हे.	अकुशल	कुशल	साहित्य पुरवठा	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
(१)	वनपरीक्षेत्र अधिकारी, चांदवड देवळा रोहयो रोपवाटीका शेरी	. .	३२६२२१	१३८१८०	६४७१	४९०८७२
(२)	रोपवाटीका शेरी	. .	३००१९४	२०१००	२२४२०	३४२७१४
(३)	जल व मृद संधारण कामे, कांचणे	२०.००	४२१२३४	१२१०२	. .	४३३३३६
(४)	जल व मृद संधारण कामे, खर्डे	२०.००	४२१२३४	१२१०२	. .	४३३३३६
(५)	जल व मृद संधारण कामे, हनुमंतपाडा	२०.००	४२१२३४	१२१०२	. .	४३३३३६
(६)	जल व मृद संधारण कामे, वार्शी	२०.००	४२१२३४	१२१०२	. .	४३३३३६
(७)	जल व मृद संधारण कामे, शेरी	२०.००	४२१२३४	१२१०२	. .	४३३३३६
(८)	जल व मृद संधारण कामे, वडाळा	२५.००	५२६५४२	१५१२८	. .	५४१६७०
	एकूण . .	. .	. .	. .	. .	३५४१९३६

वरील कामांपैकी अ.क्र. ३ वरील मौजे काचणे येथील जल व मृद संधारणाची दगडी नालाबांध व सलग समतल चर खोदण्याच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,३३,३३६/- मंजूर केलेली आहे. त्यापैकी दिनांक १८/१/२०१२ ते दिनांक ४/२/२०१२ या कालावधीत काचणे येथील दगडी नालाबांध कामावर खालीलप्रमाणे मजूरांना मजूरी देण्यात आलेली आहे.

अ.क्र. (१)	वर्ष (२)	कामाचे नांव (३)	गांवाचे नाव (४)	हजेरी पटाचा कालावधी (५)	हजेरी पट क्रमांक (६)	रक्कम (७)
१.	२०११-१२	दगडी नालाबांध	काचणे	दि. १८/१/१२ ते २१/१/१२	६६८८१	१०,५०६/-
२.	—”—	—”—	—”—	दि. २३/१/१२ ते २८/१/१२	६६८८२	११,३६४/-
३.	—”—	—”—	—”—	दि. ३०/१/१२ ते ४/२/१२	६६८८३	१२,०२५/-
					एकूण . .	३३,८९५/-

वरीलप्रमाणे काचणे येथील कामावर रक्कम रु. २२ हजार एवढा खर्च झालेला नसून रक्कम रु. ३३,८९५/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. दिनांक ५ फेब्रुवारी, २०१२ पासून कामावर मजूर उपलब्ध होत नसल्याने पुढील कामे होऊ शकली नाही. सदर मजूरीची रक्कम मजूरांचे या योजनेअंतर्गत उघडण्यात आलेल्या देना बँक व बँक ऑफ इंडिया देवळा शाखेत त्यांचे बचत खात्यात जमा करण्यात आलेली आहे. पुढील कामासाठी मजूर येत नसल्याने मजूर मिळावे यासाठी वनपरीक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक या क्षेत्रिय कर्मचा-यांनी गांवामध्ये दवंडी देऊन तसेच सभा घेऊन कामाबाबत प्रचार व प्रसिध्दी करुन सरपंच/ ग्रामसेवक यांना पत्र जा.क्र. मग्रारोहयो/२३१, दि.६/३/२०१३ अन्वये कामे सुरु करणेसाठी मजुरांची आवश्यकता असल्याने मजूर उपलब्ध करुन देणेसाठी कळविले आहे. तसेच पत्र जा.क्र.मग्रारोहयो/३४६, दि. १५/३/२०१३ अन्वये मजूर उपलब्ध करुन देण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतू नोंदणीकृत व जॉबकार्डधारक मजूर उपलब्ध होऊ शकले नाही.

❖ सन २०१०-११ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षातील अखेरचा शिल्लक निधी वाढत गेलेला असल्याने नियोजनाप्रमाणे कामे करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले दिसत नाहीत याची कारणे काय ?

• महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात आलेली कामे व त्यावर झालेला खर्च.

वर्ष	सुरु करण्यात आलेली कामे	झालेला खर्च	निर्माण झालेले मनुष्य दिवस
२०१०-११	४७७	६१५.९२	५.४७
२०११-१२	५४८०	४३३७.६२	१८.२०
२०१२-१३	६२६३	८९१४.८४	३७.७३
२०१३-१४	२०५८	४९४१.६५	१९.८४
. . . .	मजुरांचे मागणीप्रमाणे कामे सुरु करण्यात आलेली आहेत		

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीमध्ये वार्षिक नियोजनाची प्रस्तावित कामांपैकी किती कामे सुरु आहेत.त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे आराखडा प्रस्तावित करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. सदरहू सूचनेमध्ये नमूद आहे की, संबंधित एजन्सीने गावामध्ये जाऊन कोणती कामे करणे शक्य आहे त्याचा अंदाज घेऊन ती कामे ग्रामपंचायतीला सूचवावीत. त्यानंतर ग्रामपंचायतीने ग्रामसभेची बैठक घेऊन त्याबाबतचा आराखडा तयार

करावा. सदरहू आराखड्यातील ग्रामसभेने दिलेली सर्व कामे नियोजन आराखड्यामध्ये घ्यावीत व शर्तीवर कमीत कमी ५ कामे तयार ठेवण्यात यावीत, त्यानंतर मागणी प्रमाणे कामे करण्यात येतात. सन २००९-१० ते सन २०१३-१४ या कालावधीतील प्रस्तावित कामांमध्ये प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली आहे व त्याकरिता जिल्हा प्रशासनाने चांगल्या प्रकारचे प्रयत्न केले आहे. मनरेगा योजनेंतर्गत सन २००९-१० मध्ये ५५२ कामे झालेली आहेत, सन २०११-१२ मध्ये ५,४८० व सन २०१२-१३ मध्ये ६,२६३ कामे झालेली आहेत.सन २०१३-१४ मध्ये कामांची संख्या थोडीशी कमी झालेली आहे. माहे डिसेंबर, २०१५ मध्ये प्रशासनाने मेळावा घेऊन प्रत्येक गावामध्ये जाऊन कोणाला काम पाहिजे याची माहिती घेतली होती त्यावेळी जवळपास १० हजार लोकांनी अर्ज भरुन दिले आहेत. योजनेच्या कामावर येण्याकरिता लोकांकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांच्या पैकी ६५०० लोक काम करण्यासाठी उपलब्ध झाले. यामधील काही लोक खरीपाच्या तयारीसाठी परत गेले आहेत. त्यासंदर्भात समितीने सूचित केले की, नाशिक जिल्ह्यामध्ये १५ तालुके असून मोठ्या प्रमाणात आदिवासी बहूल भाग आहे. तेथील लोकांना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. राज्यात रोजगार हमी योजना सन १९७७ मध्ये सुरु झाली असून त्यामध्ये कालांतराने निरंतर बदल झाले आहेत. सन २००६-०७ मध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात येऊन अभिसरणाची (कन्व्हर्जनची) योजना सुरु करण्यात आली. त्यातील कोणतीही योजना अभिसरण (कन्व्हर्जन) करुन त्याकरिता अधिक निधी मिळविता येतो. नाशिक जिल्ह्याची व्याप्ती, आदिवासी बहूल भाग, वन जमीन, पाण्याची परिस्थिती लक्षात घेता रोहयो योजनेचे काम जिल्ह्यात मोठया प्रमाणात झालेले नाही. यासंदर्भात जिल्हाधिका-यांनी समितीस सांगितले की, उपरोक्त कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दोन मेळावे घेतले आहेत. पहिल्या मेळाव्यामध्ये १०,००० अर्ज प्राप्त झाले व त्यापैकी ७,५०० लोकांनी प्रत्यक्षात काम केले आहे. माहे एप्रिलच्या, २०१५ च्या दुस-या आठवड्यापर्यंत सदरहू संख्या ६,५०० पर्यंत आली आहे. तसेच माहे मार्च, २०१६ अखेर एक मेळावा घेतला असून मजुर कमीत कमी जून अखेरपर्यंत कामावर येतील अशी अपेक्षा आहे. नाशिकमध्ये प्रगत शेती मोठया प्रमाणात आहे. शेत मजुरीचे दर व योजनेच्या दरामध्ये फरक आहे त्यामुळे लोक शेतीमधील मजुरीस प्राधान्य देतात. द्राक्ष, डाळिंब बाग तसेच सुरगाणा येथे मोठ्या प्रमाणात स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेण्यात येत असून त्या ठिकाणी शेत मजूरीचे प्रमाण अधिक आहे.

जिल्ह्यामध्ये दरवर्षी जवळपास १,५०० ते १,७०० विहिरींना मंजूरी देण्यात येत आहेत. प्रत्येक विहिरीसाठी ९९३ मनुष्य दिवस असतात. यावर्षी जवळपास १,७०० विहिरी खोदण्यात येणार असून त्या पूर्ण होतील. मागील वर्षामध्ये जिल्ह्यात १,७०० विहिरींचे काम पूर्ण करण्यात आले आहे. यावर्षी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत प्रत्येक गावामध्ये १० विहिरींचे पुनर्भरण सक्तीचे केले असून सद्यःस्थितीत ३५० विहिरींची कामे सुरु आहेत व या कामांमुळेही मजूरांची संख्या वाढणार आहे.यावर्षी इंदिरा आवास योजना व शौचालय योजनेचे अभिसरण (कन्व्हर्जन्स) शासनाने केले आहे. पुढील ३ महिन्यामध्ये इंदिरा आवास योजनेतून १० हजार घरकूलाचे काम पूर्ण होणार असल्याने यातून मजुरांना मजुरी उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात सध्या ७,००० ते ७,५०० मजुर संख्या उपलब्ध आहे ती जवळपास २५ ते ३० हजार पेक्षा अधिक होईल.

नियोजन आराखडा कधी तयार करण्यात येतो असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, माहे ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये नियोजन आराखडा तयार करण्यात येतो. दिनांक २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा बोलविण्यात येते व त्यामाध्यमातून ग्रामपंचायतीकडून आराखडे मागविण्यात येत असतात. सदरहू ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीला आराखडे पाठविण्यात येतात व पंचायत समितीकडून जिल्हा परिषदकडे पाठविण्यात येतात व ते माहे डिसेंबरमध्ये अंतिम करण्यात येतात. त्यावर समितीने आणखी विचारणा केली की, आराखडे पाठविण्याबाबत ग्रामपंचायतीकडून कशा प्रकारचा प्रतिसाद मिळतो. त्यावर जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सन २०१४ मध्ये जलयुक्त शिवार योजनेची कामे मोठ्या प्रमाणात घेतलेली असल्याने गावाकडून आराखडा पाठविण्याबाबत चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळाला आहे. मागील ५-१० वर्षांचा आराखडा पाहिला तर सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये सादर करण्यात आलेल्या आराखड्यापेक्षा अधिक कामे झालेली आहेत. सदरहू कालावधीमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे मनरेगा योजनेतून दुष्काळासंदर्भातील सर्व कामे करुन घेण्यावर भर देण्यात आला होता. सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये जेवढी कामे करण्यात आली आहेत तेवढी कामे सन २०१६-१७ मध्ये करण्यात येणार आहेत.

मनरेगा योजनेच्या माध्यमातून कृषी विभागाशी अभिसरण (कन्व्हर्जन) करता येते. शेतकरी आपल्या शेतामध्ये स्ट्रॉबेरी उत्पादन घेत असेल किंवा हॉर्टिकल्चरचा प्लॅन्ट करीत असेल तर त्याला योजनेतून मजूरी देता येते. हॉर्टिकल्चरसाठी पाण्याचे नियोजन करता येते व कम्पार्टमेंट बांध बांधता येतात. तसेच हॉर्टिकल्चरसाठी अनेक कामे कृषीच्या माध्यमातून करता येणे शक्य आहे. अशा प्रकारचा प्रयत्न नाशिक जिल्ह्यामध्ये विशेषतः आदिवासी भागामध्ये करण्यात आला आहे काय असे समितीने

विचारले असता जिल्हा कृषी अधिकारी यांनी सांगितले की, आदिवासी भागामध्ये सन २०१६-१७ मध्ये फळबाग लागवड कार्यक्रम मनरेगा योजनेतून १०० टक्के राबविण्यात येणार आहे. फळबाग लागवडीचे जवळपास १० हजार हेक्टरचे नियोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी फळबाग योजनेच्या कामांना १०० टक्के मंजूरी देऊन कामे करण्यात आली आहेत.

मनरेगा योजनेच्या माध्यमातून गांडूळ खतही तयार करता येते. तसेच गायीकरिता गोठा बांधता येतो असे समितीने निदर्शनास आणले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मनरेगा योजनेतून ३५ प्रकारची कामे करता येऊ शकतात. सद्यःस्थितीत विहिरींसाठी अधिक मागणी आहे. रस्त्यांच्या कामासाठी आता कमी प्रमाणात मागणी होत असून व्यक्तिगत स्वरुपातील योजनांसाठी अधिक मागणी करण्यात येत आहे. सार्वजनिक कामांसाठी कमी प्रमाणात मागणी आहे.

रोजगार हमी योजनेसंदर्भात तालुकास्तरापर्यंत प्रशिक्षण वर्ग कार्यक्रम घेण्यात आला आहे काय असे समितीने विचारले असता जिल्हाधिका-यांनी सांगितले की, माहे जानेवारीमध्ये तालुकास्तरावर सरपंच मेळावा घेण्यात आला आहे. जिल्हा स्तरावर माहे फेब्रुवारी मध्ये ग्रामसेवक, तलाठी, सरपंच व यंत्रणेचे कर्मचारी यांचा मेळावा घेण्यात आला आहे.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००९-१० ते २०१३-१४ या वर्षाचे आराखडे तयार करतांना ग्रामसभेने मंजूर केलेली कामे जिल्हापरिषदेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली. तथापि, जिल्हापरिषदेस ग्रामसभेने मंजूर केलेली कामे कमी करण्याचा अधिकार नसल्यामुळे वार्षिक नियोजन आराखडा अवास्तव असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. ग्रामसभेने मंजूर केलेला आराखडा ज्यावेळी जिल्हापरिषदेकडे मान्यतेसाठी येतो त्यावेळी त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार जिल्हापरिषदेस असणे आवश्यक आहे. वार्षिक नियोजनाचा आराखडा मंजूर करतांना ग्रामपंचायतीना वार्षिक नियोजनाच्या दृष्टीने यंत्रणा स्तरावरील व जिल्हास्तरीय अधिका-यांनी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. याबाबींमुळे आराखडयामध्ये शेल्फवरील कामांची संख्या जास्त असल्याचे दिसून येते तसेच मजुरांची नोंदणी व कामांच्या ठिकाणी प्रत्यक्ष मजुरांची उपलब्धता यामध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याचे समितीला भेटीच्या वेळी दिसून आले.

कामाचे वार्षिक नियोजन शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करणे आवश्यक असतांना नियोजन आराखडयामध्ये अनेक त्रुटी असल्याचे समितीस निदर्शनास आले. त्यामुळे कामाचे वार्षिक नियोजन असमाधानकारक असून यापुढे संबधित यंत्रणांनी शासनाच्या विहित मार्गदर्शक तत्वानुसार कामे घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न करावेत व यासंदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी,अशी समितीची शिफारस आहे.

(२) मजुरांच्या सोयी सवलतीवर करण्यात आलेला खर्च :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील 'मजुरांच्या सोयी सवलतीवर करण्यात आलेला खर्च' या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात १.४० टक्के खर्च सोयी सवलतींवर करण्यात आलेला आहे तर दुसरीकडे कृषी अधिका-यांनी ७.८७ टक्के एकाच कामावर खर्च केलेला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले की, विविध कामांसाठी १ लाख ७८ हजार रुपये खर्च झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. मजुरांच्या सोयी सवलतीमध्ये हत्यारांना धार लावणे, पाण्याचे वाटप करणे, लहान मुलांना सांभाळणे इत्यादी कामांसाठी १४ हजार रुपये खर्च झालेले आहेत. त्याबाबत समितीने पृच्छा केली की, मजुरांच्या सोयी सवलतींवर ३ टक्क्यांपेक्षा जास्त खर्च कसा काय झालेला आहे? त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सन २००९-२०१० मध्ये ७ टक्क्यापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. त्यानंतर १.२१ टक्के खर्च केलेला आहे. त्यानंतरच्या आर्थिक वर्षामध्ये ३.८१ टक्के खर्च केलेला आहे. अशा प्रकारे कमी अधिक प्रमाणात खर्च केलेला आहे. सन २००९-२०१० मध्ये १.७८ लाख रुपयांचे काम झालेले असून या प्रमाणात मजुरांच्या सोयी सवलतींवर जास्त खर्च झालेला आहे.

सन २०११-२०१२ मध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी ८.२२ टक्के खर्च केला आहे. सन २०१३-२०१४ मध्ये काही विभागांनी अतिशय कमी प्रमाणात खर्च केला आहे. माहिती मधील परिशिष्ट क्रमांक " दोन " वर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव यांनी मजुरांच्या सोयी सवलतींवर २१.८२ टक्के खर्च केला आहे. परंतु त्याची सविस्तर माहिती समितीस देण्यात का आलेली नाही असे समितीने विचारले असता जिल्हा परिषदेच्या कृषी विकास अधिकारी यांनी सांगितले की, मजुरांना पाणी वाटप, हत्यांराना धार लावणे याकरिता आठ मजूर कामावर होते. त्यांच्यासाठी ३३ हजार रुपये खर्च झालेला आहे.

माहितीमधील परिशिष्ट "दोन" वर उप वनसरंक्षक(पूर्वभाग), नाशिक यांनी सन २०११-१२ मध्ये मजुरांच्या सोयी सवलतींवर ०.६८ टक्के खर्च केलेला आहे. सदरहू खर्च कोणत्या कारणांसाठी खर्च केलेला आहे असे समितीने विचारले असता उपवनसरंक्षक नाशिक (पूर्व) विभाग यांनी सांगितले की, नर्सरीला पाणी देण्यासाठी तलाव जवळ असल्यामुळे जास्त मजुराची आवश्यकता भासली नाही तसेच शेड बांधलेले असल्यामुळे सावलीसाठी खर्च करण्याची आवश्यकता भासली नाही. त्यामुळे खर्चाचे प्रमाण कमी झालेले आहे.

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आश्वासित केल्यानुसार समितीने प्रश्नावलीच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांची पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

❖ सन २००९-१० ते २०१३-१४ या वर्षात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव या यंत्रणांनी मजुरांच्या सोयीसवलतीवर जास्त खर्च केल्याची कारणे काय आहेत ?

• (१) (अ) सन २००९-१० मध्ये त्र्यंबकेश्वर तालुक्यातील रोहयो कामावर मजगीची २ कामे व शेततळयाची २ कामे अशी एकूण ४ कामे प्रत्यक्षात पूर्ण करण्यात आलेली आहे. सदरची कामे विखुरल्या स्वरुपात असल्याने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होवू न शकल्याने कामावरील उपस्थित मजूरांना दूरच्या अंतरावरुन पाणी उपलब्ध करुन देण्यात आल्याने एकूण सुविधावरील रु. ०.१४ लाख खर्चापैकी दाई व पाणी पुरवठा याबाबीवर एकूण रु. ०.११ लाख म्हणजे ६.१८ टक्के इतका खर्च करण्यात आलेला आहे. दुष्काळाची परिस्थिती असल्याने मजूरांना पिण्याचे पाणी पुरवठा करणे ही अत्यावश्यक बाब असल्याने सदरील वित्तीय वर्षामध्ये सुविधावर ३ टक्क्यापेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे. शासन निर्णय क्रमांक रोहयो-२००३/प्र.३८/रोहयो-६, दिनांक २६ ऑगस्ट, २००३ अन्वये बाब क्र. इ- सर्वसाधारण बाब क्र. ३ मध्ये रोहयो मजूरांना देण्यात येणारे सानुग्रह अनुदान, प्रसुती अनुदान, रजा अनुदान, हत्याराचे भाडे, हत्यारास धार लावण्याचा खर्च इ.बाबी सुविधावरील खर्चाची टक्केवारी काढताना धरु नयेत अशा सूचना आहेत. त्याअनुषंगाने सुधारित टक्केवारी काढणेत आली आहे.

(ब) सन २०११-१२ मध्ये नाशिक - मजगी-९ काम, विहिर पुनर्भरण - ९ कामे, त्र्यंबकेश्वर-मजगी ३६ कामे, सी.सी.टी-५ कामे, शेततळे २ कामे, पेठ-मजगी ३० कामे, इगतपूरी मजगी-२६ कामे, सी.सी.टी-१५ कामे, कळवण मजगी-५८ कामे, रोपवाटीका-७ कामे, व सिन्नर कपार्टमेंट बंडिंग-३८ कामे, विहीर पुनर्भरण ८ कामे लहान माती बांध-१ कामे अशी एकूण जिल्ह्यात - मजगी -१५९ कामे, सी.सी.टी-२० कामे, विहीर पुनर्भरण-१७ कामे, कपा.बंडिग ३८ कामे, शेततळे-२ कामे, रोपवाटीका ७ कामे व लहान माती नालाबांध १ अशी एकूण २४४ कामे प्रत्यक्षात करण्यात आलेली आहे सदरची कामे विखुरल्या स्वरुपात असल्याने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होवू न शकल्याने कामावरील उपस्थित मजूरांना दूरच्या अंतरावरुन पाणी पुरवठयाकरिता बैलगाडीचा वापर करुन पाण्याची उपलब्धता करुन देण्यात आल्याने एकूण सुविधावरील खर्चापैकी दाई रु. ०.५१ लाख, पाणी पुरवठा याबाबीवर रु. ४.८५ व बैलगाडीने पाणी पुरवठा याबाबीवर रु. ०.२७ लाख असा एकूण रु. ५.६३ लाख म्हणजे एकूण खर्चाच्या १.९२ टक्के इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदर बाबींचा खर्च गृहित धरतांना मजूरांसाठी हत्यारे अवजारे, हत्यारांचे भाडे, हत्यांरांना धार लावणे व बाबीवरील रु. ४.११ लाख खर्च शासन निर्णय क्रमांक रोहयो- २००३/प्र.३८/रोहयो-६/दिनांक २६ ऑगस्ट, २००३ अन्वये बाब क्र. इ- सर्वसाधारण बाब क्र. ३ मध्ये रोहयो मजूरांना देण्यात येणारे सानुग्रह अनुदान, प्रसुती अनुदान, रजा असल्याने सदर बाबी वगळून सुधारीत टक्केवारी काढणेत आली आहे. सदर खर्चाची टक्केवारी ३.८१ ऐवजी ती आता १.९२ इतकी येते ती मर्यादीत आहे असा खुलासा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नाशिक यांनी सादर केला आहे.

(२) कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, नाशिक :- कार्यालयाने खुलासा केला आहे की, रस्त्याच्या कामावर ५,५५,२०७/- इतका खर्च झाला असून मजूरांच्या सोयी सवलतीवर रु. ३६,२३०/- खर्च झालेला आहे. शासन निर्णय क्रमांक रोहयो-२००३/प्र.३८/रोहयो-६,दिनांक - २६ ऑगस्ट, २००३ अन्वये बाब क्र.इ - सर्वसाधारण बाब क्र.३ मध्ये रोहयो मजूरांना देण्यात येणारे सानुग्रह अनुदान, प्रसुती अनुदान, रजा अनुदान, हत्याराचे भाडे, हत्यारास धार लावण्याचा खर्च इ.बाबी सुविधावरील खर्चाची टक्केवारी काढताना धरु नयेत अशा सूचना असल्याने सदर बाबी वगळून सुधारीत टक्केवारी काढणेत आली आहे. सदर खर्चाची टक्केवारी ६.५२ ऐवजी ती आता ४.४० इतकी येते. सिन्नर व इगतपुरी तालुक्यात दुष्काळ असल्याने तीव्र पाणी टंचाई होती व त्यामुळे कामावरील मजुरांना पाणी वाटपासाठी जास्तीचे मजुर लावण्यात आले त्यामुळे सोयी सवलतीवर जास्त खर्च झाला आहे.

(३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, मालेगांव यांनी खुलासा केला आहे की, सदर कामावर एकूण ३२,६०८/- इतका खर्च झाला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :- मजूरांनी केलेल्या कामापोटी एकूण रु. २५४०४/-(७७.९१ टक्के) व मजुरांचे सोयीसवलतीवर रु. ७२०४/- इतका खर्च झालेला आहे त्यात हत्यार पाजण्यासाठी रु. १०४८/- (३.४२ टक्के) खर्च झाला आहे. पाणीवाटपासाठी रु. ६१५६/- (१८.८७ टक्के) खर्च झाला आहे. सदर काम उन्हाळयात झाल्याने या कामावरील सरासरी ७ मजुरांसाठी साधारणतः १.०० कि.मी अंतरावरुन पाणी पुरवठा करणेसाठी स्त्री मजुर लावण्यात आली होती.

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सन २००९-१० व २०११-१२ मध्ये मजुरांच्या सोयी सवलतींवर ३ टक्के इतका खर्च होणे अपेक्षित असताना मजुरांच्या सोयी सवलतींवर मोठ्या प्रमाणावर खर्च होण्याची कारणे काय आहेत. याबाबत माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, उपरोक्त कालावधीतील ती जुनी प्रकरणे आहेत. कामाच्या ठिकाणी जवळ पाणी उपलब्ध नसल्यामुळे बाहेरील ठिकाणाहून पाणी आणावे लागत होते आणि त्यासाठी स्वतंत्र मजूर नेमण्यात आले होते. त्यामुळे काही कामांमध्ये मजुरांच्या सोयी सवलतीवरील खर्चाचे प्रमाण वाढलेले आहे. त्यासंदर्भात समितीने सूचना केली की, मजुरांच्या सोयी सवलतींवर ३ टक्के खर्च झाला पाहिजे आणि मजुरांना सोयी सवलतीही उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. उपरोक्त प्रकरणी कृषी विभागाच्या अधिका-यांनी माहिती दिली की, सन २००९-१० मध्ये ४ कामे सुरु होती. पाणी पुरवठा व दाई याबाबीवर ११ हजार रुपये खर्च झालेले आहेत आणि तो खर्च ६.१८ टक्के इतका आहे. कृषी अधिका-यांकडून दिलेले उत्तर समितीला समाधानकारक वाटले नाही. त्यामुळे त्याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.

अभिप्राय व शिफारशी :

मजुरांच्या सोयी सवलतीवर खर्चाच्या संदर्भात समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१०-११ व २०११-१२ या वर्षात काही यंत्रणांनी एकूण खर्चाच्या टक्केवारी पेक्षा जास्त रक्कम मजूरांच्या सोयी सवलतीवर खर्च केलेली आहे. विविध यंत्रणांनी उपस्थित असलेल्या मजुरांना सोयी सवलती पुरविण्यासाठी शासन निणर्यानुसार एकूण खर्चाच्या ३ टक्के एवढी रक्कम खर्च करणे अपेक्षित आहे. मजुरांच्या सोयी सवलतींवरील खर्चाची टक्केवारी काढताना हत्यारांचे भाडे व हत्याराला धार लावण्याचा खर्च विचारात घेऊ नये असा शासन निर्णय आहे. तरीही प्रस्तुत बाबींचा मजुरांच्या सोयी सवलतीवरील खर्चामध्ये अंतर्भाव केल्याने टक्केवारी वाढल्याचे दिलेले कारण समितीने या संदर्भात अधिक स्पष्टीकरण मागवूनही संबधितांना योग्य माहिती पुरविता आली नाही म्हणून समितीचे समाधान झाले नाही. **सबब, मजुरांना शासन निर्णयानुसार विहित मर्यादेत सोयी सवलती उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व यंत्रणांनी योग्य काळजी घ्यावी अशी समितीची सूचना असून यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे याची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) मजुरांची नोंदणी व किमान मजुरी :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील 'मजुरांची नोंदणी' या संदर्भात समितीने विचारणा केली की, मजुरांचे नोंदणीकरण पाच वर्षानंतर करीत असताना नोंदणी कमी होण्याची कारणे काय आहेत, नाशिक जिल्ह्यात कामासाठी मजूर का उपलब्ध होत नाहीत. मजूरांना प्रोत्साहित करण्यासाठी कोणते प्रयत्न केले अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, नाशिक जिल्ह्यात आदिवासी भाग मोठया प्रमाणात असून पेठ, सुरगाणा या ठिकाणी आदिवासीचे प्रमाण जास्त आहे. नाशिक जिल्ह्यात काम मांगो अभियानाच्या निमित्ताने प्रत्येक आदिवासी पाडयावर स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. तेथील गावांमध्ये काम घेतले तर आदिवासी कामावर यायला तयार आहेत. पेठ, सुरगाणा हे तालुके गुजराथ राज्याच्या सीमेवर असून त्या भागात उद्योग असल्यामुळे त्यांना तेथे मजुरी म्हणून ३०० रुपये रोज मिळतो. त्यामुळे बहुतांश मजुर त्या भागातील उद्योगामध्ये कामावर जातात तसेच कळवण, दिंडोरी भागात द्राक्ष आणि डाळिंबाच्या बागा आहेत. तेथे पती-पत्नी एकत्रपणे कामावर गेल्यास त्यांना दररोज ६०० ते ७०० रुपये मिळतात. रोहयोच्या कामावर मजूर येत नसल्याने ग्राम रोजगार सेवकांची बैठक घेऊन त्यांना तालुक्याच्या ठिकाणी दिवस ठरवून दिला जातो आणि कामाची मागणी करावी म्हणून अर्ज गावोगावी दिले आहेत.

माहे ऑक्टोबर, २०१३ अखेर पुरुष व स्त्रियांची एकूण नोंदणी झालेल्या कुटुंबाची संख्या ३,००,८३४ आणि जॉब कार्ड फक्त २,७९,६०५ लोकांना देण्यात आली याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी सांगितले की, कुटुंबांची संख्या ३,००,८३४ असून त्यापैकी २,७९,६०५ कुटुंबांना २००८ मध्ये जॉब कार्ड देण्यात आले आहे.

५ वर्ष संपल्यानंतर शासनाने सन २०१३ मध्ये नव्याने नोंदणी करण्याचे ठरविले. पूर्वीच्या जॉब कार्डमध्ये दुय्यम (Duplicate) कार्डांचा समावेश असल्यामुळे संख्या जास्त दिसून येत होती. ग्रामपंचायतीच्या कामावर जॉब कार्ड दिले गेले तसेच यंत्रणेच्या कामावर दुस-या आठवडयात मजूर कामासाठी जाणार असेल तर गटविकास अधिकारी यांच्याकडून जॉब कार्ड देण्यात आले. त्यामुळे एकाच कुटुंबाकडे दोन-दोन जॉब कार्ड जमा झाले. त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, माहे ऑक्टोबर २०१३ अखेर ३ लाख कुटुंबांची नोंदणी करुन घेतली. शासनाच्या सुचनेनुसार नोंदणी केली असली तरी प्रत्यक्ष कामावर आल्यानंतर जॉब कार्ड देण्यात आले आहे तसेच जे कामावर आले नाहीत ते वगळले आहेत व स्थलांतरित मजूर आहेत त्यांचे जॉब कार्ड काढता आले नाही. कामाची मागणी केली आणि कामावर आले की त्यांना जॉब कार्ड देण्यात येते. पूर्वी सरसकट पध्दतीने जॉब कार्डचे वाटप केले जात असल्यामुळे जॉब कार्डची संख्या जास्त दिसते. आता कामावर आल्यानंतर जॉब कार्ड देण्यात येते. त्यामुळे संख्येमध्ये तफावत दिसते. सन २००८ पासून आतापर्यंत रोजगार हमी योजनेच्या कामावर एक दिवस जरी काम केले असेल तर त्यांना जॉब कार्ड दिलेले आहे. तसेच जुनी कामे केलेली आहेत त्यांनाही जॉब कार्ड दिलेले आहे.

साधारणपणे ८,०६,१०३ लोकांची नोंदणी केलेली आहे. नोंदणी केली त्यापेक्षा १० टक्के लोकांनी देखील कामाची मागणी केली नाही. उर्वरित लोकांची नोंदणी बोगस आहे का ? असे समितीने विचारले असता जिल्हाधिका-यांनी स्पष्ट केले की, नोंदणी बोगस केलेली नाही. लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव यंत्रणांनी गावोगावी जाऊन फॉर्म भरुन घेतले आहेत, म्हणून संख्या जास्त झाली आहे. प्रत्यक्ष नोंदणीप्रमाणे मजूर उपलब्ध होत नाहीत.

❖ पाच वर्षानंतर मजुरांची नोंदणीकरण करीत असतांना नोंदणी कमी होण्याची कारणे काय आहेत?

- योजनेच्या सुरुवातीच्या कालावधीत बेरोजगार भत्ता मिळेल हया अपेक्षेने मोठया प्रमाणावर मजुरांनी नोंदणी केली होती. दिनांक २५ जुलै, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये जॉबकार्ड अद्यवतीकारण मोहीमेद्वारे मागील वर्षभरात किमान एक दिवस काम केलेल्या मजुरांना जॉबकार्ड वितरीत करण्यासाठी त्यांची संपूर्ण माहिती फॉर्म नं. १ मध्ये भरुन घेणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार संख्या सिमित होऊन प्रत्यक्षात काम करणा-या कुटुबांना नविन जॉबकार्ड वाटप करण्यात आले आहेत.

❖ माहे ऑक्टोबर, २०१३ अखेर नोंदणी झालेल्या कुटुंबाची संख्या आणि जॉबकार्ड फक्त २,७९,६०५ लोकांना देण्यात आले याची कारण काय आहेत?

- नाशिक जिल्हयात ३०३४०८ कुटुंबापैकी २८०६२६ कुटुंबांना जॉबकार्ड सन २००८ मध्ये वितरीत करण्यात आले असून यात ७६७९९० मजूर समाविष्ट आहेत. मागणीप्रमाणे जॉबकार्ड वाटप करण्यात आले आहे. नाशिक जिल्हयात सद्यस्थितीत ३,१७,१२८ कुटुंबांना जॉबकार्ड वाटप करण्यात आले असून त्यावरील मजूर संख्या ८,७०,४५८ आहे.

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, नाशिक जिल्ह्यात सद्यःस्थितीत जॉबकार्ड धारकांची संख्या किती आहे. त्यापैकी किती मजुरांनी बँकेत खाते उघडले आहे. जिल्ह्यात जॉबकार्ड धारकांची संख्या वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, सद्यस्थितीत ३,२१,०३२ लोकांनी जॉबकार्डसाठी अर्ज केले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ३,१७,१२८ लोकांना जॉबकार्ड दिलेले आहे. ज्यांचे काम सुरु झालेले आहे त्यांचे बँकेत खाते उघडण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ९५ टक्के मजुरांचे बँक खाते आधार कार्डासोबत लिंकअप केलेले आहेत.

अभिप्राय व शिफारशी :

सन २०१३-१४ मध्ये नोंदलेल्या एकूण मजुरांची संख्या २,७९,६०५ इतकी आहे. तथापि, नोंदणी केलेल्या मजुरांपैकी खूपच कमी मजुरांनी कामाची मागणी केली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. जिल्हयामध्ये आदिवासी भाग मोठया प्रमाणात असून आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. तथापि, जिल्हयातील आदिवासी भाग हा गुजरात राज्याच्या सीमेवर असून त्या भागातील उद्योगांमध्ये मजुरांना रुपये ३००/- प्रमाणे मजुरी मिळते तसेच जिल्हयातील कळवण, दिडोंरी, नाशिक व निफाड या भागामध्ये बागायती शेतीचे प्रमाण जास्त असून तेथे द्राक्ष व डाळींब पिकाच्या बागा आहेत तेथील मजुरांनाही रुपये ३००/- प्रमाणे मजुरी मिळते. त्या तुलनेत रोजगार हमी योजनेच्या कामावर सध्या रुपये १९२/- इतकी नवीन दराने मजुरी मिळत असल्यामुळे मागणी करुनही मजुर कामावर येत नाही असे समितीच्या निदर्शनास आले आहे. **यामुळे रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांच्या मजुरीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता असल्याचे समितीला प्रकर्षाने जाणवले. यास्तव रोजगार हमी योजनेच्या कामावरील**

मजूराच्या मजुरीत वाढ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहेत.

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेले अपघात :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील " महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेले अपघात " या संदर्भात समितीने विचारणा केली की, कणकोरी-निमोण रस्त्याच्या लगतच्या बंधा-यातील गाळ काढण्याच्या कामावर दिनांक १६ जानेवारी, २०११ रोजी अपघात झाला होता. अपघातग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबास सानुग्रह अनुदान २५ हजार रुपये कसे दिले सानुग्रह अनुदान म्हणून किती मदत दिली जाते असे समितीने विचारले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, दिनांक २५ मार्च, २०१२ रोजी गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी कै. श्री. रामचंद अहिरे यांच्या पत्नीना २५ हजार रुपयांचा धनादेश दिला आहे व पुढील २५ हजार रुपयांची मागणी शासनाकडे सादर केली असून शासनाकडून मान्यता मिळताच ती रक्कम त्यांच्या कुटुंबाला दिली जाईल. त्यावर समितीने पृच्छा केली की, २५ हजार रुपये देण्याचा प्रस्ताव सध्या कुठला स्तरावर प्रलंबित आहे ? त्यासंदर्भात गटविकास अधिकारी, सिन्नर यांनी सांगितले की, कै. श्री. अहिरे यांच्या कुटुंबास २५ हजार रुपये दिले आहेत व आणखी २५ हजार रुपये देय आहेत. केंद्र शासनाच्या हिश्यापैकी देय असलेल्या रक्कमेसाठी तहसीलदार यांच्यामार्फत उप जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविला असता त्यामध्ये त्रुटी असल्यामुळे तो शासनाकडून परत आला होता. तथापि, त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव पुन्हा सादर केला आहे. त्यावर समितीने प्रस्तुत प्रकरणी आणखी विचारना केली की, सन २०११ या वर्षातील उपरोक्त घटना आहे. ३ वर्षापूर्वी मयत झालेल्या मजुराच्या नातेवाईकास अद्यापपर्यंत पूर्णपणे मदत दिलेली नाही. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून निधी मिळत असला तरी याबाबत यंत्रणाकडून झालेली दिरंगाई अक्षम्य आहे. यानंतरही दिरंगाई झाली तर संबधित अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले. त्यावर उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी समितीस आश्वासन दिले की, समितीच्या सूचनेनुसार अहवाल सादर करण्यात येईल.

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सन २०११ मध्ये कणकोरी निमोण रस्त्यालगत बांधा-यातील गाळ काढताना झालेल्या अपघाताचे स्वरुप काय होते त्यावर जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, बंधा-यावरील गाळ काढताना कै. श्री. रामचंद्र दगडू अहिरे या कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर त्याला रु. २५,०००/- इतके अनुदान दिले होते. तथापि, त्याला अनुज्ञेय असलेल्या अनुदानापैकी २५ हजार रुपये द्यावयाचे राहिले होते. दिनांक ६ डिसेंबर, २०१४ रोजी आदेश काढून त्यांच्या कुटुंबीयांना उर्वरित २५ हजार रुपये दिलेले आहेत. नरेगा अंतर्गत काम करणा-या कामगाराचा मृत्यू झाला तर कशा प्रकारे मदत द्यावी, याबाबतचे नियम आहेत. त्यानुसार त्यांच्या कुटुंबीयांना २५ हजार रुपये केंद्र शासनाचा हिस्सा व २५ हजार रुपये राज्य शासनाचा हिस्सा असे एकूण ५० हजार रुपये दिलेले आहेत. त्या कामगाराचा कामावर काम करताना हृदय विकाराच्या झटक्यामुळे मृत्यू झाला होता. याप्रकरणी समितीने आणखी विचारणा केली की, त्यांच्या कुटुंबीयांना ५० हजार रुपये मदत कशातून दिलेली आहे त्यावर जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, केंद्र आणि राज्य शासनाचा हिस्सा असतो. त्यातून त्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान दिलेले आहे. जर या प्रकरणामध्ये दुर्लक्ष झाले असेल तर त्याची कारणे शोधून ती माहिती समितीस देण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :

कणकोरी-निमोण रस्त्याच्या लगतच्या बंधा-यातील गाळ काढण्याच्या कामावर श्री. रामचंद्र अहिरे यांचा दिनांक १६ जानेवारी, २०११ रोजी अपघात होऊन त्यांचा मृत्यू झाला. अपघातग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबास शासन निर्णयाप्रमाणे रु. ५०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देय असतांना मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सन २०१२ मध्ये फक्त रुपये २५,०००/- इतक्या रकमेचा धनादेश देण्यात आला तथापि, **केंद्र शासनाकडे यंत्रणेच्या संबधित अधिका-यांनी प्रस्ताव उशिरा पाठविल्यामुळे व कामांत केलेल्या दिरंगाईमुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना ३ वर्षानंतर म्हणजेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये सानुग्रहाची उर्वरित रक्कम प्राप्त झाली. उपरोक्त प्रकरणी संबधित अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या दिरंगाई बद्दल कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

विविध स्तरांवर अशा प्रकारे प्रकरणांची प्रलंबित असलेली अनुदानाची रक्कम विहित कालावधीत मिळण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व संबधित यंत्रणेच्या अधिका-यांनी कार्यवाही करावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

(५) अपूर्ण कामे :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील " अपूर्ण कामे " या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २०११-२०१२ मधील अपूर्ण कामांची संख्या ५०१ आहे, सन २०१२-२०१३ मधील ५६८ व ऑक्टोबर, २०१३ अखेर १२९ कामे अपूर्ण आहेत. अपूर्ण कामांपैकी बरीचशी कामे वनीकरणाची आहेत. मागील ५ वर्षामध्ये वनीकरणाची कामे मोठया संख्येने अपूर्ण राहिली आहेत. माहितीतील परिशिष्ट क्रमाक " तीन " वरील कामे सन २००८-०९ मधील आहेत. ही सर्व कामे ५ वर्षे चालू राहणार आहेत. गाळोशी येथील ५ लाख रुपयांचे वनीकरणाचे काम ५ वर्षे चालू राहणार आहे. या कामाचे स्वरुप काय आहे असे समितीने विचारले असता विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ यांनी सांगितले की, हे वनीकरणाचे कामे असून यामध्ये पहिल्या वर्षापासून ५ वर्षापर्यंत वनीकरणाचे संरक्षण करावयाचे असते. त्यामुळे हे काम ५ वर्षे चालू असते. रोपे लावल्यानंतर पहिल्या, दुस-या व तिस-या वर्षीही निंदणीचे काम करावे लागते. सन २००८-०९ या वर्षात १० लाख ७४ रोपे लावली आहेत. त्यापैकी या वर्षापर्यंत ८० ते ९० टक्के रोपे जीवंत राहिलेली आहेत. त्यावर समितीने सूचना केली की, वृक्ष लागवडीसाठी १८ लाख ९६ हजार रुपये खर्च झाल्याचे नमूद केले आहे. परंतू वृक्षांची संख्या व जीवंत राहिलेल्या वृक्षांची टक्केवारी सुध्दा नमूद केली पाहिजे.

पेठ तालुक्यातील उसतळेगाव येथील रोपवाटिकेमधील ६० हजार रोपे ३ वर्षापासून कोणत्या कारणाने पडून आहेत. तसेच जिल्हयातील रोपवाटिकांमध्ये मागील ५ वर्षात किती रोपे तयार करण्यात आली. त्यापैकी शासकीय यंत्रणांना किती रोपांचे वितरण करण्यात आले व किती रोपे शिल्लक राहिली त्याचप्रमाणे चणकापूर येथील नर्सरीतील ४५ हजार रोपे मागील ४ वर्षापासून शिल्लक राहिले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्या रोपांवर झालेला खर्च वाया गेलेला आहे याबाबतचा खुलासा करण्यात यावा अशी समितीने विचारणा केली असता विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ यांनी विदित केले की, जिल्हयात ४-५ वर्षापूर्वीची रोपे शिल्लक राहिलेली नाहीत. तथापि, विभागाकडे २ वर्षापूर्वीची ४२ लाख रोपे शिल्लक राहिलेली असून त्यामध्ये पेठ तालुक्यातील रोपवाटिकेतील रोपाचा समावेश आहे. विभागाने स्वतःहून ज्या यंत्रणांसाठी ही रोपे तयार केली होती त्या यंत्रणांनी दुष्काळामुळे रोपे उचलली नाहीत. उपरोक्त प्रकरणी समितीने मत व्यक्त केले की, शासकीय यंत्रणेने नियोजन केल्यानंतरही अशा प्रकारच्या घटना होऊन शासनाच्या पैश्याचा अपव्यय होत असेल तर ही बाब गंभीर आहे.

माहितीतील परिशिष्ट क्रमांक " तीन " वरील कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, नाशिक (पूर्व) यांच्या अंतर्गत असलेल्या कातरवाडी ते नगरचौकी रस्ता सुधारणा ० ते ३ कि.मी. या रस्त्याचे काम ५ वर्षे सुरु होते. या कामाचे स्वरुप काय आहे असे समितीने विचारले असता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, नाशिक (पूर्व) यांनी सांगितले की, या रस्त्याच्या साईड पट्टीचे काम मजुराअभावी पूर्ण झाले नाही. त्यावर समितीने निदर्शनास आणले की, या कामावर ५ वर्षामध्ये ४ लाख ८२ हजार रुपये खर्च झालेला असून अद्यापपर्यंत सदरहू काम पूर्ण झालेली नाही. त्यासंदर्भात कायर्कारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, या कामाची मागणी आल्यानंतर काम सुरु करण्यात आले परंतु त्यानंतर मजूर उपलब्ध न झाल्यामुळे काम बंद पडले आहे. तथापि, आता हे काम वगळण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. त्यासंदर्भात समितीने असेही निदर्शनास आणले की, सदरहू कामाला दिनांक १० मे, २०१० रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रत्यक्षात कामाला सुरुवात दिनांक २७ जून, २०११ रोजी झाली आहे. काम सुरु होण्यासाठी इतका विलंब होण्याचे कारण काय ? त्यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सदरचे काम मंजूर करुन घेण्यात आले परंतू प्रत्यक्षात ५ महिन्यानंतर काम सुरु झाले यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, काही यंत्रणांची कामे खूप वर्षापासून सुरु आहेत. ही बाब वारंवार यंत्रणांच्या निदर्शनास आणलेली आहे. जी कामे अपूर्ण आहेत व पूर्ण होण्यासारखी नसतील त्यांच्या बाबतीत समर्पक माहिती तयार करुन ती कामे वगळण्याचा प्रस्ताव तयार करावा अशा सूचना दिलेल्या आहेत. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने १३ सूचना दिलेल्या आहेत. अपूर्ण कामांची ४ वर्ग केलेले आहेत. उपरोक्त रस्त्याचे काम ३२.२२ लाख रुपयांचे आहे. आतापर्यंत या कामावर ४.८२ लाख रुपये खर्च झाले आहेत. उपरोक्त कामांवर १० टक्क्याच्या आत खर्च झालेला असल्यामुळे सदरहू काम वगळण्याचा प्रस्ताव सादर करावा असे समितीने निर्देश दिले असता कार्यकारी अभियंता यांनी आश्वासन दिले की, सदरहू काम वगळण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

कार्यकारी अभियंता, ल.पा.(पूर्व), जि.प.नाशिक यांनी गावतलाव इंद्रायवाडी, ता.चांदवड येथील कामासाठी (प्र.क्र. १४३) दिनांक २१ मे, २०१२ रोजी सुधारित अंदाजपत्रक तयार केले आहे, परंतु प्रशासकीय मान्यतेसाठी काम थांबलेले आहे. या कामासाठी प्रशासकीय मान्यता न मिळण्याचे काय कारण काय आहे असे समितीने विचारले असता कार्यकारी अभियंता,

लघुसिंचन (जलसंधारण) यांनी सांगितले की, तलाव फुटल्यानंतर या प्रकरणाची चौकशी झाली म्हणून प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी विलंब झालेला आहे. त्यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, सदरहू तलावासाठी मूळ अंदाजपत्रकानुसार ३.६३ लाख रुपये मंजूर होते. फक्त सुधारित अंदाजपत्रकानुसार ४.११ लाख रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावयाची होती. तरी देखील एवढा विलंब का झालेला आहे त्यावर कार्यकारी अभियंता यांनी प्रतिपादन केले की, काम पूर्ण झालेले आहे, परंतु तलाव फुटल्यामुळे या प्रकरणाची चौकशी झाली, फुटलेल्या तलावाची दुरुस्ती करावयाची आहे. त्यासंदर्भात समितीने सूचना केली की, सदरहू प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून कार्यवाही पूर्ण करावी.

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आश्वासित केल्यानुसार समितीने प्रश्नावलीच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांची पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

❖ मागील ५ वर्षामध्ये वनीकरणाची कामे मोठया संखेने अपूर्ण राहण्याची काय आहेत?

- वनीकरणाची कामे ५ वर्षीय असल्याने कामे पूर्ण झालेनंतर पूर्णत्वाचे दाखले सादर करण्यात येतात त्यामुळे सदरची कामे अपूर्ण कामामध्ये दिसतात.

❖ वनीकरण विभागाकडे ४२ लाख रोपे शिल्लक राहिलेली आहेत याची कारणे काय ?

- शतकोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत विविध विभागांनी ७१ लाख रोपांची मागणी केली होती. परंतू सन २०१२ मध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे रोपांचा विनीयोग पाहीजे तसा होऊ शकला नाही. त्यामुळे रोपे शिल्लक राहीली होती.

❖ सन २००९ मे सन २०१३ पर्यंत जलसंवर्धनाची एकूण १४९६ अपूर्ण कामे असण्याची कारणे काय आहेत? तसेच त्या कामांचा तपशिल समितीला देण्यात यावा.

- सन २००९-१० ते २०१३ ऑक्टोबर अखेर जलसंवर्धनाची एकूण १२३५ कामे अपूर्ण होती त्यापैकी १०९० कामे पूर्ण झालेली असून १४५ कामे अपूर्ण आहेत. यंत्रणानिहाय जलसंवर्धनाचे अपूर्ण कामांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	यंत्रणेचे नाव	अपूर्ण कामांची संख्या	३१ मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण कामांची संख्या	सद्यस्थितीत अपूर्ण कामांची संख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	विभागीय व्यवस्थापक वनप्रकल्प विभाग, पश्चिम भाग, नाशिक.	१२	१२	०
२.	जिल्हापरिषद, ग्रा.पं. नाशिक	१२४	११०	१४
३.	जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	९०२	८५२	५०
४.	उपवनसंरक्षक पूर्व भाग, नाशिक	८६	२६	६०
५.	उपसंरक्षक पश्चिम भाग, नाशिक	८३	६२	२१
६.	उपविभागीय वनाधिकारी, मालेगांव	०९	०९	००
७.	कार्य.अभि.कडवा कालवा, नाशिक	०७	०७	००
८.	कार्य.अभि.मालेगांव पाटबंधारे विभाग	१२	१२	००
	एकूण . .	१२३५	१०९०	१४५

❖ नाशिक वनीकरण विभागाअंतर्गत २४ हजार झाडांचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी २ लाख ९३ रुपये मंजूर करण्यात आले, परंतू प्रत्यक्षात ४ हजार झाडे लावण्यात आली आहे. जास्त प्रमाणांत रक्कम खर्च होण्याचे काय कारण आहे ?

- सामाजिक वनीकरण विभाग, नाशिक अंतर्गत लागवड अधिकारी, येवला यांनी सन २०११-१२ मध्ये येवला तालुक्यात विखरणी ते कानडी २ कि.मी. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड केली होती. सदर लागवडीस तहसीलदार येवला यांचे कडील पत्र क्र.मग्रारोहयो/एसआर/२२/२०११ अन्वये रु. ३५४३६०/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर योजनेमध्ये रस्ता दुतर्फा उंच रोपाची लागवड करणे अंतर्गत २ कि.मी. मध्ये २००० रोपे लागवडीचे उदिष्ट होते. परंतू काही ठिकाणी अतिक्रमण, काहीक्षेत्र खडकाळ असल्यामुळे प्रत्यक्षात १०२२ इतकेच खड्डे खोदून १०२२ इतकी रोपे लागवड केली आहे व सदर कामावर १६२५०२/- इतका खर्च झाला आहे. मंजूर अंदाजपत्रकानुसार खर्च करण्यांत आला असून जास्त प्रमाणात खर्च झालेला नाही. सदर कामवर अकुशल खर्च रु. १३५४३६/- व कुशल खर्च २७०६६/- असा एकूण १६२५०२/- इतका खर्च झाला आहे. लागवड अधिकारी येवला यांना सन २०११-१२ मध्ये २००० वृक्ष लागवडीचे उदिष्ट देण्यात आलेले होते. त्यापैकी १०२२ वृक्षलागवड करण्यात आलेली आहे. पुस्तिकेमध्ये नजरचुकीने २४००० वृक्षलागवडीचे उदिष्ट आणि ४०३४ झाडे लावण्यात आल्याचे टंकलिखित झाले आहे असा खुलासा उपसंचालक सामाजिक वनीकरण विभाग, नाशिक कार्यालयाने त्यांचेकडील पत्र जा.क्र./मग्रारोहयो/२४२/२०१४, दिनांक ४ जुलै, २०१४ अन्वये केला आहे.

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की,चांदवड व देवळा भागामध्ये वन विभागातील अपूर्ण असलेल्या कामांची सद्यःस्थिती काय आहे त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, वन विभागांतर्गत मंजूर झालेल्या ३५ लाख निधी मधून वन विभागास कामे करावयाची होती. परंतू केवळ २२ हजार रुपयांची कामे तीन वर्षात करण्यात आली, त्यापैकी काचरे गावातील एक काम ४ लाख ३३ हजार रुपयांचे होते. सदरहू कामाकरिता १५ दिवस मजूर उपलब्ध होते व त्यानंतर ते कामावर आले नाही. यामुळे सदरहू कामे अपूर्ण अवस्थेत राहिले. यासंदर्भात समितीने सूचित केले की, रोजगार हमी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी वरच्या स्तरावरुन खालच्या स्तरावर होणे आवश्यक आहे. याकरिता जिल्हा स्तरावरील यंत्रणेचा प्रमुख अधिकारी प्रोत्साहण देणारा असणे गरजेचे आहे. मध्य प्रदेश राज्याने या योजनेंतर्गत ६ हजार कोटी रुपये केंद्राचा निधी वापरला आहे व महाराष्ट्रात केवळ पावणे दोन कोटी रुपयांची कामे करण्यात आली आहेत. मध्यप्रदेश राज्य ६ हजार कोटी रुपये मनरेगांतर्गत खर्च करीत असेल तर महाराष्ट्राने किमान १० हजार कोटी रुपये खर्च करणे अपेक्षित आहे. मनरेगा योजनेंतर्गत वन विभागाने केवळ ३३ हजार रुपयांची कामे केलेली असल्याने सदरहू बाब समाधानकारक नसल्याचे समितीने मत व्यक्त केले. तसेच दरभंगा पॅटर्न संदर्भात वन विभागाकडून कामे करण्यात येतात का अशी विचारणा केली असता त्यावर जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, ग्रामपंचायत भागात रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येते, त्यावेळी दरभंगा पॅटर्न राबविण्यात येतो. चांदवड व देवळा भागातील वन विभागाचे काम अपूर्ण होते असे समितीने निदर्शनास आणले असता उपवनसंरक्षक, वनविभाग (नाशिक पूर्व) यांनी सांगितले की, सदरहू काम पूर्ण करण्यासंदर्भात मजूर उपलब्ध करुन देणेबाबत सन २०१३ मध्ये संबंधित गावच्या सरपंच यांना पत्र देण्यात आले होते तसेच सन २०१४ मध्ये दोन वेळा पत्र पाठविण्यात आले होते.

रोजगार हमी योजनेची कामे आता शेल्फ झाली आहे. शेल्फवर २५,५०० कामे कागदोपत्री दाखविण्यात आली असतील तर ती सुरु असल्याचे खालच्या स्तरावर दिसणं आवश्यक आहे. योजनेचा निधी खर्च होऊन लोकांना योजनेचा लाभ झाला पाहिजे, वन क्षेत्र वाढले पाहिजे, मजूरांना काम उपलब्ध करुन दिले पाहिजे. वन क्षेत्रातील आदिवासींच्या कुपोषणाचा फार मोठा प्रश्न आहे. वन क्षेत्रात खूपच कमी प्रमाणात कामे झाली आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, मनरेगाची कामे वाढविण्यासंदर्भात सर्व संबधित अधिका-यांची दोन वेळा कार्यशाळा घेण्यात आली असून त्यावेळी त्यांना कशा पध्दतीने काम करावयाचे हे सांगण्यात आले आहे. खालच्या स्तरावर यंत्रणेला कामे करण्यासाठी प्रवृत्त केले नाही तर कामे होत नाहीत. त्यामुळे प्रत्येक गावामध्ये कमीत कमी एक मनरेगाचे काम सुरु ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच, प्रत्येक अधिका-याच्या कार्यक्षेत्रात तलाठी, ग्रामसेवक व इतर जे कोणी असतील त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमित एक काम सुरु राहील याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे. एक गाव, एक काम आणि एक अधिकारी, एक काम सतत चालू ठेवण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे.

सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत जॉबकार्ड धारकांची संख्या किती होती व जॉबकार्ड देऊनही मजूर कामावर न येण्याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, शासनाने जॉबकार्ड संदर्भात माहे जुलै, २०१२ मध्ये परिपत्रक निर्गमित केलेले आहे. मागील ५ वर्षात जे लोक एकदा जरी कामावर आले असतील तरी सर्वांना जॉबकार्ड वितरित करावे. त्याप्रमाणे जॉबकार्ड वितरित करण्यात आलेले आहे. ज्या लोकांनी काम केलेले नाही त्यांना त्यांच्या

मागणी प्रमाणे जॉबकार्ड उपलब्ध करुन देण्यात येतात. सन २०११-१२ मध्ये ६ हजार कामे झालेली आहेत. सन २०१६-१७ मध्ये त्यापेक्षा जास्त कामे करण्यात येणार आहे. त्यावर समितीने सूचित केले की, जॉबकार्डच्या आधारावर केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासन निधी आणणार आहे. राज्यात रोजगार हमी योजनेवर प्रत्येक वर्षी ८ हजार कोटी रुपये खर्च झाले पाहिजेत म्हणजे प्रत्येक जिल्ह्यात ३०० ते ४०० कोटी रुपये खर्च झाले पाहिजेत. नाशिक जिल्ह्यात ३० ते ४० कोटी रुपये खर्च झालेला असेल. तर त्यापेक्षा ८ ते १० पट जास्त खर्च करणे अपेक्षित आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, नाशिक जिल्हयात ८९ कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

सन २०११-१२ ते २०१३-१४ या तीन वर्षामध्ये कामे झालेली नसताना पुढील वर्षासाठी कशाच्या आधारावर नवीन कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, शासनाच्या सूचना आहेत की, मागील सेल्फवरील कामे सुरु झाली नसतील तर ती कामे पुढील वर्षी घेण्यात यावीत.शासनाच्या सदरहू सुचनेप्रमाणे आराखडा तयार आला आहे.

शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून १६.९६ कोटी इतकी रक्कम शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे काय असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जेवढा निधी खर्च करावयाचा आहे तेवढा निधी आगाऊ प्राप्त होत नाही. फक्त वेतन देण्यासाठी निधी प्राप्त होतो व वेतन झाल्यानंतर उर्वरित निधी सरेंडर करण्यात येतो. प्रत्येक वर्षी आराखडा तयार करण्यात येतो आणि त्या आराखड्याप्रमाणे मागणी नोंदविण्यात येते व मागणी नोंदविल्यानंतर जिल्हाधिकारी स्तरावर निधी येतो. तथापि, आता उपरोक्त प्रमाणे निधीचे वितरण करण्यात येत नाही.

जिल्ह्यामध्ये सद्यःस्थितीत कोणकोणत्या विभागाची व कोणकोणती कामे अपूर्ण आहेत, सदरहू कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, सदरहू कामे पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सन २००९ ते २०१३ या दरम्यान एकूण १२६१ कामे अपूर्ण होती. त्यापैकी ९९६ कामे पूर्ण केली. त्या कालावधीतील २६५ कामे अपूर्ण आहेत ती जून महिन्यापर्यंत पूर्ण करण्याचा जिल्हयातील यंत्रणाचा प्रयत्न आहे. काही ठिकाणी मजूरांअभावी कामे अपूर्ण होती, तर काही कामे भौतिकदृष्टया पूर्ण होती, काही ठिकाणी अकुशल कामे पूर्ण झाली होती तर कुशलची कामे बाकी होती अशी वेगवेगळी कारणे आहेत. जी कामे वर्षानुवर्षे अपूर्ण होती अशी जवळपास साडेचार हजार कामे सन २०१५-२०१६ मध्ये वर्षभरात पूर्ण केली आहेत. आता फक्त १७ ते १८ हजार कामे अपूर्ण आहेत.

जिल्ह्यातील रोपवाटिकांमध्ये किती रोपे लागवडी अभावी सद्यःस्थितीत पडून आहेत. त्याची कारणे काय आहेत, सदरहू रोपे लावण्यासाठी शेतक-यांना ती का देण्यात येत नाहीत, दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीची रोपे शिल्लक राहण्याची कारणे कोणती अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम यांनी सांगितले की, सन २००९-२०१० मध्ये विविध विभागांनी मागणी केल्यानुसार रोपे तयार करण्यात आली होती. त्यापैकी ४२ लाख रोपे शिल्लक राहिली. विविध विभागांनी मागणी करुनही रोपांची उचल केली नाही म्हणून रोपे शिल्लक राहिली. त्यामुळे ही रोपे शाळा व महाविद्यालयांना तसेच काही संस्थांना दिली. त्याशिवाय एफडीसीएमने देखील काही रोपे लावली. आता १४ लाख रोपे शिल्लक आहेत. त्यावर समितीने विचारणा केली की, ज्या विभागांनी रोपे तयार करण्यास सांगितली परंतु त्यांनी न घेण्याची कारणे काय आहेत.त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, त्यावेळी शासनाने १०० कोटी वृक्ष लावण्याची एक महत्वाकांक्षी योजना आणली होती. १०० कोटी वृक्ष लागवड दोन वर्षात ही लागवड करावयाची होती. पहिल्या वर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे ती टक्केवारी ५० पर्यंत गेली. योजनेचे पहिले वर्ष असल्यामुळे तेवढे नियोजन झाले नव्हते पहिल्या वर्षी ४० टक्के आणि दुस-या वर्षी ६० टक्के काम करणार होतो. परंतु दुर्दैवाने दुस-या वर्षी मोठा दुष्काळ असल्यामुळे वृक्ष लागवड फायदेशीर होणार नव्हती त्यामुळे ब-याच विभागांनी अंग काढून घेतले आणि शासनाने देखील त्यांना सहभागी करुन घेतले नाही. एकूण ७१ लाख रोपांची मागणी होती तथापि, रोपे न उचलल्यामुळे ४२ लाख रोपे शिल्लक राहिली. सन २०१३ आणि २०१४ च्या पावसाळ्यात ही रोपे शाळा, महाविदयालयांना दिली तसेच रस्त्याच्या बाजूला लावण्यात आली. शासकीय आवारामध्ये रोपे लावण्यासाठी मोफत देण्यात येतात परंतू खाजगी आवारामध्ये लावावयाची असतील तर त्यांच्याकडून पैसे घेण्यात येतात.सदरहू ७१ लाख रोपांसाठी ६.३३ कोटी रुपये खर्च करण्यात आला.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००९-१० मध्ये शतकोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत वन विभागाने विविध विभागांसाठी ७१ लाख रोपांची मागणी केल्यानुसार रोपे तयार केली होती. परंतू वन विभाग व इतर विभागांमध्ये असलेल्या समन्वयाचा अभाव, दुष्काळ यामुळे ४२ लाख रोपे शिल्लक राहिल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याप्रकरणी वन विभागाने नियोजन करुनही इतक्या मोठया प्रमाणात रोपे शिल्लक राहिल्याने शासनाच्या पैशाचा अपव्यय झाला असल्याचे दिसून येते. याप्रकरणी वन विभागाच्या संबधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करते.

(६) विहिर कार्यक्रम :-

जिल्ह्यामध्ये सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या पाच वर्षात किती विहिरींची कामे करण्यात आली आहेत. त्यापैकी सद्यःस्थितीत किती अपूर्ण आहेत. कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, तीन वर्षात ५ हजार ९०० विहिरी करावयाच्या होत्या. पहिल्या वर्षी १७००, दुस-या वर्षी १८०० आणि तिस-या वर्षी २४०० असे प्रत्येक वर्षासाठी उद्दिष्ट दिले होते. पहिल्या वर्षी १५०० विहिरींचे उद्दिष्ट (टार्गेट) ठरविण्यात आले होते, ते जवळपास १०० टक्के पूर्ण झाले आहे. दुस-या वर्षाचे टार्गेट सुरु झालेले आहे. सन २०१६-२०१७ मध्ये ३५६ विहिरी सुरु झालेल्या आहेत. त्यानंतर समितीने विचारणा केली की, सुरुंग यंत्र उपलब्ध नसल्यामुळे ९७ विहिरी अपूर्ण अवस्थेत आहेत. त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एकूण ५ हजार ४८४ विहिरी होत्या. त्यापैकी ३ हजार ४५२ पूर्ण झाल्या तर २ हजार ३२ अपूर्ण आहेत. यातील काही विहिरी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या आहेत, त्याशिवाय दरवर्षी अंदाजामध्ये (एस्टीमेटमध्ये) बदल होत असतो. त्यावर समितीने सूचना केली की, एखाद्या विहिरीचे काम तीन वर्षे झाले तरी पूर्ण होत नसेल तर ज्या अर्धवट अवस्थेत असेल तेवढे बील देऊन तो विषय तेथेच पूर्ण करावा जेणेकरून तो विषय मार्गी लावता येईल व प्रलंबित विहिर दिसणार नाही. त्यावर जिल्हाधिकारी यांनी निदर्शनास आणले की, त्यामुळे विहिरींचे ध्येय साध्य होणार नाही. तसेच त्या विहिरींवर जो काहीही खर्च केला असेल त्याचा काही फायदा होणार नाही. याबाबत रोहयो विभागाचे उपसचिव यांनी स्पष्ट केले की, एकूण ३ हजार ४५० विहिरी होत्या. सन २०१४-१५ मध्ये १ हजार ८४ पूर्ण केल्या. तर सन २०१५-१६ मध्ये १ हजार ८२१ विहिरी पूर्ण केल्या. १ हजार ७५१ विहिरी चालू आहेत. विभागाने ५० विहिरींमागे एक ज्युनिअर इंजिनिअर दिलेला आहे. ज्या १ हजार ७५१ विहिरी आहेत त्या पावसाळ्यापर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने यंत्रणेने प्रयत्न करावा. त्यावर जिल्हाधिकारी यांनी खुलासा केला की, मागील वर्षी जवळपास १८०० विहिरींचे काम पूर्ण केले असून यावर्षी मार्च पूर्वी जवळपास २ हजार विहिरींचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

विहिरी अपूर्ण राहतात याचे कारण काय आहे, शेतक-यांनी घेतलेल्या विहिरींची बीले वेळेत का देण्यात येत नाहीत, कामाचे मोजमाप वेळेत का होत नाही, शेतक-याला मंजूर झालेल्या विहिरीतून त्याला वैयक्तिक लाभ मिळतो, त्याच्या कुटुंबाला त्यामधून मजूरी मिळते म्हणून शेतकरी विहिरीचे काम स्वतःहून थांबवणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. अनेक वेळा विहिरीमध्ये सुरुंग करण्यासाठी मशीन उपलब्ध करुन देण्यात येत नाही, विहिरीचे काम होऊ नये याकरिता जाणीवपूर्वक अडवणूक करण्यात येते असे समितीने निदर्शनास आणले असता जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, याप्रकरणी अभ्यास केला असून काही ठिकाणी उपरोक्त बाबीचा संबध येत असतो तर काही ठिकाणी इतरही कारणे आहेत. सन २००९-१० मध्ये विहिरीसाठी १ लाख रुपये अनुदान देण्यात येत होते ते आता ३ लाख रुपये देण्यात येते. पूर्वी घेतलेल्या विहिरीसाठी ५० हजार रुपये खर्च होऊन काम बंद झाले असेल व ते काम आजच्या डीएसआरनुसार पूर्ण करावयाचे असेल तर जवळपास दीड लाख रुपये खर्च येतो. सदर खर्च करण्याची शेतक-यांची क्षमता नसते. प्रशासनालाही सदरहू मंजूर विहिरीसाठी अधिकचे अनुदान देणे शक्य होत नाही. या कारणास्तव काही विहिरींचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी प्रतिपादन केले की, विहिरींचे काम करण्यात येत असते त्याचे मोजमाप एमबीमध्ये घेऊन संबंधिताना पैसे देण्यात येतात. विहिरीचे काम पूर्ण केले नाही तर पैसे देण्यात येत नाही. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा व त्र्यंबक या भागातील आदिवासी विहिरींचे लाभार्थी म्हणून पैसे घेतात व कच्ची विहीर बांधतात आणि विहिरीला पाणी लागल्यानंतर ते पैसेही घेत नाहीत व कामही पूर्ण करत नाहीत. प्रशासनाकडून विहिरीचे जेवढे काम होईल त्यानुसार पैसे देण्यात येतात. त्यावर समितीने जवळपास १८०० विहिरी पूर्ण न होण्याची कारणे तपासली असता निदर्शनास येते की, काही कामांचे बील देण्यात आले नाही. याप्रकरणी समितीने सूचना केली की, काही कामांसाठी लाभार्थ्यांनाहीप्रोत्साहित करण्याची आवश्यकता आहे. एका विहिरीचे काम पूर्ण झाले तर लाभार्थीची ५ एकर जमीन बागायती होते. त्यामुळे १०० दिवसांच्या आत अपूर्ण विहिरींचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य हाती घ्यावे.

अभिप्राय व शिफारशी :

समितीने बैठकीच्या वेळी जिल्ह्यात विहिरींच्या कामांसंदर्भात माहिती विचारली असता समितीला सांगण्यात आले की, तीन वर्षात ५ हजार ९०० विहिरी करावयाच्या होत्या. मात्र प्रत्यक्ष ५ हजार ४८४ मंजूर विहिरी पैकी ३ हजार ४५२ विहिरींची कामे पूर्ण करण्यात आली तर २ हजार ३२ विहिरींची कामे अपूर्ण आहेत. एखाद्या विहिरीचे काम तीन वर्षे झाले तरी पूर्ण होत नसेल तर ज्या विहिरींची कामे अपूर्ण अवस्थेत आहे. त्या विहिरींच्या लाभार्थ्यांची प्रलंबित असलेले देयके अदा करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत तसेच जिल्ह्यातील विशेषतः आदिवासी भागातील अपूर्ण असलेल्या विहिरींची कामे पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात यावे जेणेकरुन त्या लाभार्थ्यांची जमीन बागायती होऊ शकेल.

शासनाची विहिरींच्या कामासाठी असलेली तरतूद विचारात घेता ती जास्तीत जास्त लाभार्थ्यांना देऊन अपूर्ण विहिरी पूर्ण करण्याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. शेतक-यांना सिंचनाचा जास्तीत जास्त लाभ मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावा असे समितीचे मत आहे. विहिरींची कामे हा शेतक-यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असूनही त्याबाबत जिल्हा प्रशासन गंभीर नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. नाशिक जिल्हयात अपूर्ण असलेल्या विहिरी पूर्ण करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिका-यांनी आढावा घेऊन या विहिरी पूर्ण कराव्यात व याबाबतचा अहवाल विभागाने समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

(७) गैरव्यवहाराची प्रकरणेः-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील 'गैरव्यवहाराची प्रकरणे' या संदर्भात समितीने विचारणा केली की, रोजगार हमी योजनेच्या कामांच्या संदर्भात गैरव्यवहाराची १०७ प्रकरणे झालेली आहेत त्याची समितीला माहिती द्यावी अशी समितीने पृच्छा केली असता उपायुक्त विभागीय आयुक्त कार्यालय यांनी प्रतिपादन केले की, या प्रकरणाबाबत विभागीय आयुक्त स्तरावरुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आलेला आहे. गैरव्यवहार प्रकरणातील दोषारोप पत्राबाबत यंत्रणेमार्फत जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव पाठविला जातो आणि जिल्हाधिका-यांकडून विभागीय आयुक्तांकडे प्रकरणे येतात. सध्या १०७ प्रकरणांपैकी ४१ प्रकरणे निकाली निघाली असून ६६ प्रकरणे शिल्लक आहेत. त्यातील ४३ प्रकरणे जिल्हाधिकारी स्तरावर प्रलंबित आहेत. ती सर्व प्रकरणे यंत्रणा स्तरावर प्रलंबित असल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

नियमावलीनुसार अ व ब वर्गाच्या अधिका-यांविरुध्दची प्रकरणे शासनाकडे पाठविली जातात. उपरोक्त ४३ प्रकरणासंदर्भात अनेकदा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून यंत्रणांकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे परंतु त्यांच्याकडून परिपूर्ण माहिती न आल्यामुळे सदरहू प्रकरणे किरकोळ कारणासाठी प्रलंबित आहेत.

गैरव्यवहाराच्या प्रकरणातील किती अधिका-यांची सेवा अद्याप शिल्लक आहे व किती अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत असे समितीने विचारले असता उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी सांगितले की, सेवानिवृत्त होण्यास दोन महिने शिल्लक असतील तर चौकशीचे प्रकरण प्रलंबित ठेवले जाते. यावर समितीने सूचित केले की, यंत्रणा स्तरावरील २१ प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित असून संबधित अधिका-यांवरकारवाई करण्यासाठी पाठपुरावा होणे आवश्यक आहे. संपूर्ण राज्यात १९८० सालापासूनची गैरव्यवहाराची प्रकरणे प्रलंबित आहेत. एखादा अधिकारी निवृत्त झाला, तरी यंत्रणा स्तरावर चौकशी सुरु आहे असे समितीस सांगण्यात येते म्हणून त्या त्या वेळेत प्रकरणांचा निपटारा झाला पाहिजे व जी प्रशासकीय कारवाई करायची आहे ती केली पाहिजे. विभागीय स्तरावरील अधिका-यांनी याबाबतची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे.

विभागीय चौकशीची १० प्रकरणे शासन स्तरावर प्रलंबित आहेत. ही प्रकरणे प्रलंबित राहण्याचे कारण काय अशी समितीने पृच्छा केली असता रोहयो विभागाचे कार्यासन अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, विभागीय चौकशीची परिशिष्ट क्र. " चार " वरील प्रकरण क्र. १८, २२ ते २८ तसेच ३५, ३७ व ६२ ही प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी एक प्रकरण १९९८ सालातील असून त्यामध्ये रकमेचा भरणा झालेला नाही. सदरहू प्रकरण आयुक्तांनी शासनाकडे पाठविले असता विभागीय आयुक्तांनीच त्याबाबत निर्णय घ्यावा असे शासनाकडून कळविण्यात आलेले आहे. उर्वरित प्रकरणे शासन स्तरावर प्रलंबित आहेत.

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आश्वासित केल्यानुसार समितीने प्रश्नावलीच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांची पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.–

❖ गैरव्यवहाराच्या ६६ प्रकरणांवरील चौकशी तथा निर्णय प्रलंबित असल्याने त्यांची सद्यःस्थिती काय आहे? प्रस्तुत प्रकरणांची समितीस सविस्तर माहिती द्यावी.

- गैरव्यवहाराच्या ६६ प्रकरणांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहेः-

(१)	न्यायप्रविष्ट प्रकरणे	०१
(२)	शासन स्तरावर	११
(३)	आयुक्त स्तरावर	१३
(४)	जिल्हास्तरावर	०६
(५)	यंत्रणास्तर	२१
(६)	निकाली प्रकरणे	१४
	एकूण . .	**६६**

प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी यंत्रणास्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, गैरव्यवहाराच्या प्रकरणांपैकी शासन स्तरावर कोणकोणती प्रकरणे प्रलंबित आहेत व सदरहू प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे, अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मागील २-३ महिन्यांच्या कालावधीमध्ये जवळपास १४-१५ गैरव्यवहाराची प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. परंतू विभागनिहाय गैरव्यवहाराची वेगवेगळ्या ठिकाणची प्रकरणे प्रलंबित आहेत. (गैरव्यवहाराच्या प्रकरणांची प्रकरणनिहाय सविस्तर माहिती परिशिष्ट " चार " मध्ये नमूद केली आहे.)

माहितीमधील परिशिष्ट क्रमांक " चार " वरील आवळपाडा ता.सुरगाणा येथील कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे मंडळ, नाशिक येथील पाझर तलावाच्याकामासाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च झाला आहे. सदरहू पाझर तलावाच्या कामावर पूर्व परवानगी न घेता अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १९ जानेवारी, १९९६ रोजी विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदरहू प्रकरणी विभागीय आयुक्त यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये अंतिम शिक्षेसाठी प्रस्ताव सादर केला असता त्यांनी सदरहू प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. त्यावर समितीने सूचना केली की, सदरहू कालावधीमध्ये अधिकच्या खर्चाप्रकरणी परवानगी घेतली नाही परंतु काम पूर्ण झाले आहे, अशा पध्दतीने परवानगी मागण्यात यावी व ती देण्यात यावी. योजनेच्या कामावर अधिक खर्च केल्याबाबतची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हाधिका-यांना अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये संबंधित दोषी वाटत नसतील तर ते प्रकरण त्यांनी निकाली काढावे व दोषी असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी. उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अभिप्रायासाठी उपरोक्त गैव्यवहाराचे प्रकरणे सादर केले आहे.

गैरव्यवहाराच्या प्रकरणासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त यांनी स्पष्ट केले की, विभागीय चौकशीच्या प्रकरणी वेगवेगळ्या स्तरावर निर्णय घेण्यात येतात. गैरव्यवहार प्रकरणी ज्या अधिका-यांचे वेतन रुपये १०,६५० पेक्षा अधिक आहे त्यांच्या संबंधीचे व एका पेक्षा अधिक कर्मचारी असतील तर त्यांच्या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार शासनास आहे. वर्ग - ३ व वर्ग - ४ कर्मचा-यांच्या विभागीय चौकशी प्रकरणावर निर्णय घेण्याचा अधिकार विभागीय आयुक्त यांना आहे. यंत्रणेकडून वरिष्ठ अधिका-यांच्या चौकशी बाबतचा प्रस्ताव त्यांच्या सेवा तपशिलासह सामान्य प्रशासन विभाग व लोकसेवा आयोगाकडे पाठवावा लागतो. सदरहू प्रस्ताव पाठविताना लहानसहान तपशिलासह माहिती सादर करावी लागते व त्यामध्ये एक जरी त्रुटी असेल तर तो प्रस्ताव त्रुटीची पूर्तता करण्यासाठी परत पाठविण्यात येतो. त्यावर समितीने सूचना केली की, प्रशासकीय त्रुटीबाबत अधिका-यांना कडक कारवाई न करता समज देण्याबाबतची कारवाई करता येईल. ज्या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झाला असेल, त्या अधिका-यांवर सक्तीची कारवाई करता येईल.

माहितीवरील परिशिष्ट क्रमांक " चार " वरील पाझर तलाव येल्याची मेट व इतर ८, ता.सुरगाणा, कामाचे स्वरुप-पाझर तलावाच्या कामातील अनियमिततेबाबत, गैरव्यवहार उघडकीस आल्याचा दिनांक ०६ मार्च, २००३ असा आहे. श्री. विरेंद्र पाटील, रा.चाळीसगांव यांनी सदर काम मशीन व ठेकेदारी पद्धतीने केले असल्याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता श्री. यू. एस. राजुळे यांनी तांत्रिक तपासणी करुन माहिती दिली आहे. सदरहू कामाचा कार्यारंभ आदेश देण्यापूर्वीच मोजमाप पुस्तक ३ ते ४ महिने अगोदर नोंदविल्याबाबत आहे. श्री. एच. बी. टाकळकर, कार्यकारी अभियंता, श्री. व्ही. एस. राजुळे, कार्यकारी अभियंता, श्री. आर. एस. वाणी, शाखा अभियंता, श्री. डी. बी. केदारी, शाखा अभियंता, गैरव्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी अद्याप अपूर्ण असल्याची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहे. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडील दिनांक १४ जून, २०१३ रोजी प्राप्त अहवालानुसार श्री.राजुळे, कार्यकारी अभियंता, श्री. केदारी, श्री. तळेले, श्री. सूर्यवंशी व प्रविण कुमार, तत्कालीन विभागीय लेखापाल यांचे विरुद्धचे दोषारोपपत्र दिनांक २५ जून, २०१३ रोजीच्या आदेशान्वये विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडे सादर करण्यात आले होते. परंतु, विभागीय आयुक्त यांचेकडील दिनांक ३ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार अधिकारीनिहाय निलंबन निधीच्या रकमेमध्ये तफावत असल्याने सदर तफावतीबाबतचा खुलासा विभागीय आयुक्त यांना सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरण दिनांक २८ जानेवारी, २०१६ पासून विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रलंबित असून ते शासनाकडे पाठवावे लागेल असे उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी समितीला सांगितले. त्यावर समितीने तीव्र नाराजी व्यक्त करुन विचारणा केली की, हे प्रकरण सन २००३ चे असून अद्यापपर्यंत निकाली का काढण्यात आले नाही. आयुक्त कार्यालयाकडून विभागाकडे प्रकरण आल्यानंतर विभागाने देखील काही कालमर्यादा निश्चित करावी. त्याबाबत विभागाचे उपसचिव यांनी सांगितले की, आयुक्त कार्यालयाकडून प्रकरण आल्यानंतर विभागाकडून ते प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात येते. त्यांच्याकडून अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याबाबत अपचारी यांना कळविण्यात येते.

गाव तलाव सुरेगांव, ता.सिन्नर (कार्यकारी अभियंता, ल.पा.पूर्व जिल्हा परिषद, नाशिक) येथील गाव तलावाच्या कामावरील मजूरांचे बोगस हजेरीपट तयार करण्यात येऊन मजूर मजुरीपासून वंचित राहिल्याबाबतचे, गैरव्यवहाराचे प्रकरण सन २०१३ चे असून कामाची रक्कम रुपये १७,४३१/- इतकी असून तीन हजेरीपट बोगस तयार केल्याबाबत आहे. गैरव्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित अधिकारीचे नाव-श्री.के.पी.वालेचा, कनिष्ठ अभियंता आहे. सदरहू प्रकरणाची चौकशी अद्याप अपूर्ण आहे. कार्यकारी अभियंता, ल.पा.पूर्व जिल्हा परिषद, नाशिक यांच्या दिनांक ३०-१२-२०१३ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार श्री. वालेचा यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे का असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर व्यक्तीला सेवेतून बडतर्फ केलेले असून प्रकरण नस्तीबंद करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त स्तरावर सादर करण्यात आलेला आहे.

पाझर तलाव धोंडमाळ, ता.पेठ (अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, स्था.स्तर, मंडळ नाशिक) येथील कामांमध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च झाल्याबाबत गैरव्यवहार झालेला आहे. गैरव्यवहारामध्ये अतिप्रदान रक्कम रु.२,३१,५०४/-इतकी असून सदर प्रकरण सन १९८७ मध्ये उघडकीस आलेले आहे. याप्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना परिपूर्ण अहवाल सादर केला आहे. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील दिनांक १७ मार्च, २०१५ रोजीच्या यंत्रणा स्तरावरील पत्राद्वारे कळविल्याप्रमाणे सदर प्रकरणातील अपचारी हे सेवानिवृत्त झाले आहेत. सदरचे प्रकरण शासनास विलंबाने सादर करण्यास जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांचेवर विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करणेकामी संबंधित कार्यकारी अभियंता, ल.पा.(पश्चिम) विभाग नाशिक यांना कळविण्यात आले होते. सदरहू गैरव्यवहार प्रकरणासंदर्भात समितीने आपले मत मांडले की, सदरहू गैरव्यवहाराच्या प्रकरणी सन २०१५ मध्ये पत्र पाठविण्यात आलेले आहे. संबंधित अधिका-यावर अद्याप कारवाई झालेली नाही. परंतु, ज्यांनी विलंब केलेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा विषय आहे. हे प्रकरण विभागीय आयुक्तांकडून सामान्य प्रशासन विभागाकडे येईल. संबंधित अधीक्षक अभियंता, पाटबंधारे सेवानिवृत्त झालेले असले तरी त्यांच्या निवृत्तीवेतनामधून वसुली करावी, तसेच ज्यांनी विलंब केलेला आहे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व आयुक्त कार्यालयाने १०० दिवसाच्या आत सर्व प्रकरणांचा निपटारा करावा. त्याचप्रमाणे अशा सर्व प्रकरणांमध्ये प्रकरण निहाय तपासणी करण्यात यावी, अधिका-यांना निलंबित करावे, शिक्षा करावी किंवा आवश्यक कारवाई करावी. तथापि, जेथे तांत्रिक बाबी आहेत, प्रशासकीय बाबी असतील, जेथे गैरव्यवहार झालेला नाही अशा प्रकरणांमध्ये त्यांच्याकडून कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन विषय निकाली काढण्यात यावा.

इगतपुरी तालुक्यातील टाकेदगांव व इतर २ ठिकाणच्या गावतलाव रु. १००/- पेक्षा जास्त मजुरी प्रतिदिन पडल्याबाबत, गैरव्यवहार झालेला असून गैरव्यवहार उघडकीस आल्याचे वर्ष २००१ आहे. सदरहू ठिकाणच्या कामावर मजुरांना रु.१२५/- ते २००/- रुपये मजुरी प्रतिदिन पडली असल्याबाबत शासनास तक्रार प्राप्त झाली. सदरहू गैरव्यवहारास जबाबदार असणा-या

अधिकारी/कर्मचा-यांचे नाव-श्री.इनामदार व श्री.भुरकुड असे असून त्यांची चौकशी अद्याप अपूर्ण आहे. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील आदेश जा.रोहयो/ककर्या-४/९१२७/२०१४, दिनांक ३० एप्रिल, २०१४ अन्वये सदरचे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे. सदरहू गैरव्यवहाराच्या प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सन २०१६-२०१७ या वर्षाकरिता शासनाने १९२/- रुपये प्रतिदिन मजुरी निश्चित केलेली आहे. त्यावेळी (सन २००१ मध्ये) प्रतिदिन १०० रुपये मजुरी होती. गाव तलावाचे जे काम झालेले आहे त्या कामाची सरासरी काढली तर मजुरांना प्रतिदिन १०० रुपयांपेक्षा जास्त मजुरी मिळालेली आहे. त्यावेळी मजुरांनी जास्त काम केले असेल त्यामुळे त्यांना जास्त मजुरी मिळालेली असेल. परंतु, या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली व प्रत्यक्ष कामाची मोजणी केलेली आहे. सध्या तेथील काम पूर्ण झालेले असल्यामुळे सदर प्रकरण निकाली काढलेले आहे. उपरोक्त प्रकरणासंदर्भात समितीने सूचना केली की, संबंधित अधिका-याचा सदरहू प्रकरणी काहीही दोष नव्हता. हे सन २००१ चे प्रकरण आहे. संबंधित अधिका-याला इतकी वर्षे चौकशीला सामोरे जावे लागले. उपरोक्त प्रकरणात मजुरांना थोडी अधिक मजुरी मिळालेली आहे. काम झाले असेल आणि मजुरांना जास्त मजुरी मिळाली असेल तर त्याबाबत समितीची कोणतीही हरकत नाही. त्या अधिका-याची १४ वर्षे चौकशी केल्यानंतर तो निर्दोष सुटलेला आहे. हा एक प्रकारे त्या अधिका-यावर अन्याय आहे. त्यामुळे अशी प्रकरणे लवकर निकाली निघाली पाहिजेत. उपरोक्त प्रकरणीविभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, समितीने जो विषय मांडला त्याबाबत विभागातंर्गत चर्चा करण्यात आली आहे. ब-याच प्रकरणांमध्ये छोट्या-छोट्या चुका आहेत. काही प्रकरणे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. ज्या प्रकरणामध्ये गैरव्यवहार झालेला आहे किंवा कोणी तरी मुद्दाम काही गोष्टी चुकीच्या केलेल्या आहेत अशी प्रकरणे वेगळी करण्यात यावीत. परंतु, ज्या प्रकरणांमध्ये छोट्या-छोटया चुका झालेल्या आहेत त्या संदर्भात सकारात्मक विचार करण्यात येईल.रोजगार हमी योजनेसंदर्भातील अधिका-यांना असे वाटते की, रोजगार हमी योजनेचे काम करताना आपली काही तरी चौकशी लागेल, म्हणून अधिकारी/कर्मचारी ते टाळण्याचा प्रयत्न करतात. ज्या कामांमध्ये अनियमितता झाले असेल, कार्यपध्दतीमध्ये थोडी चूक झाली असेल किंवा इतर काही छोट्या चुका असतील तर संबंधितांना ताकिद देणे आवश्यक आहेत. किरकोळ शिक्षा देऊन पुढील तीन-चार महिन्यात त्या प्रकरणाला पूर्णविराम देणे योग्य ठरेल आणि जी मोठी प्रकरणे आहेत, ज्या प्रकरणात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार झालेला आहे त्या संदर्भात विभागामार्फत वेगळी पद्धत अंमलात आणली जाईल. समितीने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने मंत्री महोदयांची मान्यता घेऊन विभागाकडून सर्व विभागीय आयुक्तांना तसे कळविण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले.

नांदगांव वेहळगांव-१६ रस्ते, ता.नांदगांव, गैरव्यवहाराचे स्वरुप व गुंतवलेली रक्कम-नांदगांव तालुक्यातील १६ रस्त्यांच्या कामावरील गैरव्यवहार रक्कम रु.५३,१३,६९४/-, गैरव्यवहार उघडकीस आल्याचा दिनांक ६ फेब्रुवारी, १९९४असा असून सदर रस्त्यांच्या कामात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार प्रकाश सदावर्ते, अध्यक्ष नाशिक पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक नाशिक यांनी दिनांक २ जून, १९९४ रोजी जिल्हाधिकारी नाशिक यांना दिली. गैरव्यवहारास जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांची नावे पुढीलप्रमाणे आहे. (१) श्री. एम. ए. कुरोडे, कार्यकारी अभियंता, रु.५,३१,३७०/-, (२) श्री. जे. के. उमाळे, उप अभियंता रक्कम रु.२१,२५,४७८/-, (३) श्री. ए. व्ही. थोरात, कनिष्ठ अभियंता रक्कम रु.२६,५६,८४७/-, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. चौकशी अद्याप अपूर्ण असल्याची सर्वसाधारण कारणे-पुढीलप्रमाणे आहेत. विभागीय चौकशी पूर्ण करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्रमांक रोहयो/कार्या-४/३७५५९/४२४४०/२००९ दिनांक ३ ऑगस्ट, २००९ अन्वये अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.चीफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१, नाशिक यांचे न्यायालयात क्रिमीनल केस नंबर १०/९७ अन्वये खटला सुरु आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील दिनांक २१ मार्च, २०१६ चे पत्रान्वये प्रादेशिक चौकशी अधिकारी यांचेकडील चौकशी अहवाल बजावून पोहोचसह अभिवेदन सादर करणेकामी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नाशिक यांना जिल्हाधिकारी कार्यालयाचे दिनांक २ एप्रिल, २०१६ अन्वये कळविले आहे. सदरहू प्रकरणाबाबत समितीने निदर्शनास आणले की, हे प्रकरण सन १९९४ पासून प्रलंबित आहे. आता २० वर्षे झालेली आहेत. त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, विभागीय चौकशी आणि प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झालेली आहे. परंतु, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे पुढील कारवाई करण्यात आली नाही. उपरोक्त प्रकरणासंदर्भात विभागाच्या सचिवांनी स्पष्ट केले की, शासनाचे धोरण आहे की, अशा प्रकरणांमध्ये विभागाने चौकशी करावयाची होती ती चौकशी पूर्ण झालेली आहे. फक्त न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने कारवाई करावी लागेल.

गाव तलाव केळुणे व इतर १३, ता. पेठ, गैरव्यवहाराचे स्वरुप-बोगस मजुरी वाटपाबाबत, गैरव्यवहार उघडकीस आल्याचा दिनांक २३ एप्रिल, १९९९आहे. विभागीय आयुक्त कार्यालयास श्री. अरुण दुसाने, रा. बोरगाव ता. सुरगाणा यांनी दिनांक २३ एप्रिल, १९९९ रोजी तार संदेश पाठवून श्री. कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी, रोहयो उप विभाग, सुरगाणा यांचा १ कोटी

६८ लाख रुपये इतक्या रकमेचा तांत्रिक तपासणीची माहिती- सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७ लाख २० हजार ५९२ इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता असताना रक्कम रुपये ७ लाख ५२ हजार ५८१ इतका खर्च झाला, गैरव्यवहारात जबाबदार असणा-या अधिका-यांची नावे- श्री. पी. एस. कुलकर्णी, शाखा अभियंताअसून चौकशीचे प्रकरण सध्या यंत्रणास्तरस्तरावर आहे. चौकशी अद्याप अपूर्ण असल्याची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहे. श्री. कुलकर्णी यांचे प्रपत्र १ ते ४ विभागीय आयुक्त यांना दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी सादर केले होते, परंतु उपायुक्त (रोहयो) नाशिक यांचेकडील दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या पत्राने कळविल्यानुसार का.अ.द.व गु.नि. कक्ष रोहेयो नाशिक यांचेकडील दिनांक २३ मे, २००६ रोजीच्या अहवालावर अभिप्रायासह व इतर त्रुटीपूर्तता करणेकामी संबंधित का.अ.ल.पा (स्था.स्त) विभाग, नाशिक यांना कळविले व दिनांक २६ ऑक्टोबर, २०१३ रोजी स्मरणपत्र दिले. त्यानंतर दिनांक २४ नोव्हेंबर, २०१३, २८ फेब्रुवारी, २०१४, ३१ डिसेंबर, २०१५, व १ एप्रिल, २०१६ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. चौकशी पूर्ण होण्यास तीन महिने इतका कालावधी अपेक्षित असून प्रकरण सध्या यंत्रणास्तरावर आहे. उपरोक्त प्रकरणासंदर्भात समितीने सूचना केली की, या संदर्भात तातडीने कारवाई करावी.

कामाचे नाव-गावतळे मांजरे सावकारवाडी, ता.मालेगाव (अधीक्षक अभियंता, ल.पा.स्था.स्तर मंडळ नाशिक), गैरव्यवहार स्वरुप-गावतळाच्या कामात शासकीय रकमेचा अपहार, गैरव्यवहार उघडकीस आल्याचा महिना/वर्ष- दिनांक २१-९-२००२, गैरव्यवहार उघडकीस पुढीलप्रमाणे आला. मालेगाव तालुक्यात रोहयोच्या नावाखाली भ्रष्टाचार सुरु असल्याचा जोरदार आरोप या मथळ्याखाली दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली. तसेच श्री.संपत कारभारी सोनवणे रा.मालेगाव, तांत्रिक तपासणी माहिती-सदर कामावर यंत्रणेने रक्कम रुपये ८ लाख ११ हजार ८२२ इतका खर्च हजेरीपटाप्रमाणे केलेला दिसून आला. परंतु कामाचे मुल्यांकन रुपये २ लाख ७६ हजार ३७७ इतके येते. त्यामुळे सदर कामावर रक्कम रुपये ५ लाख ३५ हजार ३७७ इतक्या रकमेचा अपहार झाला आहे. गैरव्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित अधिका-याचे नाव अद्यापपर्यंत निश्चित करण्यात आलेले नाही.सदरहू चौकशीचे प्रकरण जिल्हास्तरावर प्रलंबित आहे. चौकशी अद्याप अपूर्ण असल्याची सर्वसाधारण कारणे पुढील प्रमाणे आहेत. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील दिनांक ८ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या पत्रान्वये व स्मरणपत्र दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३ अन्वये सदर प्रकरणात दिनांक ९ जुलै, २००५ रोजी करण्यात आलेली संयुक्त मोजणी ही शासनाच्या दिनांक ६ मार्च, १९९२ च्या परिपत्रकातील सूचनेनुसार करण्यात आली होती किंवा कसे तसेच संयुक्त मोजणीसाठी जिल्हाधिकारी यांची परवानगी का घेण्यात आली नाही याबाबतचा खुलासा व सदर बाबतचे कार्यवाहीस जबाबदार असलेले अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करणे कामी अहवाल संबंधित का. अ. ल. पा. (पूर्व), जि. प. नाशिक यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आला. चौकशी पूर्ण होण्यास सहा महिने इतका कालावधी अपेक्षित आहे. सदरहू गैरव्यवहाराच्या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, दोन वेळा साक्ष ठेवली होती, पण ती होऊ शकली नाही. तथापि, आता दिनांक ३ मे, २०१६ रोजी साक्षठेवण्यात आली आहे त्यावेळी हे प्रकरण सादर करण्यात येईल.

उपरोक्त गैरव्यवहाराच्या प्रकरणासंदर्भात समितीने सूचना केली की, गैरव्यवहाराची प्रकरणे शंभर दिवसांमध्ये निकाली काढण्यात यावी. संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन अनियमेतेसंदर्भातील प्रकरणे प्रलंबित ठेवू नये व भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये विहित कालावधीत निर्णय घेऊन प्रकरण निकाली काढण्यात यावे. कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांस शिक्षा करण्याचा यामागे समितीचा उद्देश नाही. तथापि, रोजगार हमी योजनेची कामे प्रभावीपणे झाले पाहिजे हा समितीचा हेतू आहे.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हयात एकूण गैरव्यवहाराची ५२ प्रकरणे शिल्लक असून त्यापैकी यंत्रणा स्तरावर २१, जिल्हास्तरावर ६ व शासन स्तरावर ११ व आयुक्त स्तरावर १० प्रकरणे, चौकशी अधिकारी स्तरावर ३ प्रकरणे व न्यायप्रविष्ठ १ प्रकरण प्रलंबित आहे. सदरहू प्रकरणांपैकी काही प्रकरणे सन १९८३-८४ पासून प्रलंबित आहेत, काही गैरव्यवहारात गुंतलेले अनेक अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. शासनाच्या धोरणानुसार त्यांच्यावर जबाबदारी ठेवता येत असली तरी गैरव्यवहाराची प्रकरणे ठराविक कालावधीत निर्णयाप्रमाणे आली पाहिजेत अशी समितीने वारंवार शासनाला शिफारस केलेली आहे. **मात्र गैरव्यवहाराच्या प्रकरणांच्या संदर्भात जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त तसेच मंत्रालयीन विभागामध्ये समन्वयाचा अभाव असल्याने गैरव्यवहाराची प्रकरणे इतकी वर्षे प्रलंबित राहिलेली आहेत. त्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.**

विविध स्तरावर प्रलंबित असलेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणांसंदर्भात जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व विभाग यांनी संबधित यंत्रणेच्या वरिष्ठ अधिका-यांकडे पाठपुरावा करुन १०० दिवसांच्या कालमर्यादेत प्रकरणे निकाली काढावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट- एक

कामाचे वार्षिक नियोजन

विधानमंडळ रोजगार हमी योजना समिती

जिल्हा बैठकीची प्रश्नावली

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

प्रश्न क्रमांक १ : कामांचे वार्षिक नियोजन (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र)

सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ पर्यंत माहिती खालीलप्रमाणे आहे :-

	वर्ष	कालावधी	सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी मान्य कलेले वार्षिक नियोजन आराखडे जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना सादर केल्याचा दिनांक	ग्रामपंचायत / यंत्रणेच्या नियोजन आराखडयास जिल्हा परिषदेची मान्यता मिळाल्याचा दिनांक	मगांराग्रारोहयो आयुक्तांनी मान्यता दिल्याचा दिनांक व विलंब झाला असल्यास त्याची कारणे काय
	१	२	३	४	५
(अ)महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सुचना २००६ परीच्छेद ६ नुसार कामाच्या नियोजनाचे १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षानुसार जिल्हयाचे वार्षिक आराखडे विहीत मुदतीत तयार करण्यात आले आहेत हा काय ? नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत?	२००९-२०१०	०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१०	२४.१२.२००८	दि.२४.१२.२००८	निरंक
	२०१०-२०११	०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११	२३.१२.२००९	दि.२३.१२.२००९	
	२०११-२०१२	०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२	०८.१२.२०१०	दि.०८.१२.२०१०	
	२०१२-२०१३	०१/०४/२०१२ ते ३१/०३/२०१३	२३.१२.२०११	दि.२८.१२.२०११	
	२०१३-२०१४	०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४	२९.११.२०१२	दि.२९.११.२०१२	

प्रश्न क्रमांक १ कामांचे वार्षिक नियोजन (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र) जि.नाशिक		
सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ माहिती खालीलप्रमाणे आहे -		
	वर्ष	स्पष्टीकरण
ब) वरील कालावधीतील नियोजनाचे वार्षिक आराखडे तयार करण्याचे काम माहे डिसेंबर अखेर पर्यंत पुर्ण करण्यास काही अडचणी असल्यास थोडक्यात स्पष्टीकरण द्यावे.		
	२००९-२०१०	नियोजन आराखडा विहीत वेळेत मंजुर झाला
	२०१०-२०११	नियोजन आराखडा विहीत वेळेत मंजुर झाला
	२०११-२०१२	नियोजन आराखडा विहीत वेळेत मंजुर झाला
	२०१२-२०१३	नियोजन आराखडा विहीत वेळेत मंजुर झाला
	२०१३-२०१४	नियोजन आराखडा विहीत वेळेत मंजुर झाला

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

१क) वरील कालावधीत नियोजनाचे वार्षिक आराखडे पूर्ण झाले असल्यास जिल्हा आराखड्याचे स्वरुप नमूद करावे.

सन २००९-२०१० चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे -

अ.क्र.	कामाचे प्रकार	एकूण कामे संख्या	अंदाजित खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५	६
१	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	३९६१५	४५९८१.६६	४६५.९६	६३.६८
२	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	२७४८	४२९७.६६	४३.४६	५.९५
३	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचनाची कामे)	०	०.०००	०	०.००
४	अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती नवीन भूधारकांकिंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	०	०.००	०	०.००
५	पारंपारिक पाणीसाठ्यांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	०	०	०	०.००
६	भूविकासाची कामे	०	०	०	०.००
७	पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चा-याची कामे	०	०	०	०.००
८	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	४५२२	२९९२७.४३	२२१.४५	३०.३४
९	केंद्रशासनाशी चर्चा करुन राज्यशासनाने ठरविलेली कामे				
	अ) कृषी स्वरुपाची कामे :- नालाबांध, नालाबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, गॅबियन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम मार्कट, खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा	०	०	०	०
	क) सामाजीक वनीकरण :- गठीक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना, रोपवाटीका, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड	०	०	०	०
	ड) वनीकरण :- वनतलाव, ग.ग.चर / भु.स.स.चर, ट्रेंच कम मार्कट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स, जुन्या वनतलावाचे नूतनीकरण, बांबू रांझ्याभोवती वर्तुळाकार चर, रामगुनिया / सैटिना निर्मुलन करणे)	०	०	०	०
	इ) सार्वजनिक बांधकाम :- इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणीपुरवठा योजनेसाठी रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण / नूतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण	०	०	०	०
	एकूण	४६८८५	४२२०७.०५	७३०.८७	१००.००

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

१क) वरील कालावधीत नियोजनाचे वार्षिक आराखडे पूर्ण झाले असल्यास जिल्हा आराखड्याचे स्वरुप नमूद करावे.

सन २०१०-२०११ चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे -

अ. क्र.	कामाचे प्रकार	एकूण कामे संख्या	अंदाजित खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५	६
१	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	३५२५०	३७६७३.७०	३१४.०३	५७.३५
२	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	१७८४	११२३१.४५	९८.४७	१७.१०
३	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	०	०.००	०.००	०.००
४	अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती मधील भूधारकांकिता इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	०	०.००	०.००	०.००
५	पारंपारिक पाणीसाठ्यांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	०	०.००	०.००	०.००
६	भूविकासाची कामे	०	०.००	०.००	०.००
७	पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात वा-याची कामे	०	०.००	०.००	०.००
८	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	३३२३	१६७८२.७९	११६.३९	२५.५५
९	केंद्रशासनाशी चर्चा करुन राज्यशासनाने ठरविलेली कामे				
	अ) कृषी स्वरुपाची कामे :- मातीनालाबांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, गॅबियन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट, खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा	०	०.००	०.००	०.००
	ब) पाटबंधारे :- मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझरतलाव, पाझर कालवा, गावतलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नूतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण	०	०.००	०.००	०.००
	क) सामाजीक वनीकरण :- पडीक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना, रोपवाटीका, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड	०	०.००	०.००	०.००
	ड) वनीकरण :- वनतलाव, स.स.घर / भु.स.स.घर, ट्रेंच कम माऊंट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स, जुन्या वनतलावाचे नूतनीकरण, बांबू रांझ्यानोवती वर्तुळाकार चर, रावमुनिया / लॅटिना निर्मुलन करणे)	०	०.००	०.००	०.००
	इ) सार्वजनिक बांधकाम :- इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पानंदुरवठा योजनेसाठी रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण/ नूतनीकरण, रस्त्यांचे खडीकरण	०	०.००	०.००	०.००
	एकूण	४०३५७	६५६८७.९४	५२८.८९	१००.००

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

.१क) वरील कालावधीत नियोजनाचे वार्षिक आराखडे पूर्ण झाले असल्यास जिल्हा आराखड्याचे स्वरुप नमूद करावे.

सन २०११-२०१२ चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे -

.अ.क्र.	कामाचे प्रकार	एकूण कामे संख्या	.अंदाजित खर्च (लाखात)	.अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५	६
१	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	१८९७८	३४६२८.६४	३४६.२८	५८.३९
२	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणसहित)	३८६८	१०७३३.४६	१०७.३४	१६.६६
३	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	०	०.००	०.००	०.००
४	.अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती नवीन भूधारकांच्या इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	०	०.००	०.००	०.००
५	पारंपारिक पाणीसाठ्यांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	०	०.००	०.००	०.००
६	मृविकासाची कामे	०	०.००	०.००	०.००
७	पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चरा-याची कामे	०	०.००	०.००	०.००
८	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	३०७९	९६०८२.०९	९६०.८२	२४.९५
९	केंद्रशासनाशी चर्चा करुन राज्यशासनाने ठरविलेली कामे				
	.अ) कृषी स्वरुपाची कामे :- मातीनालाबांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, पगराई बंधारा, जैविक बांध, गॅबियन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम मार्केट, खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा	०	०.००	०.००	०.००
	ब) पाटबंधारे :- मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, माझरतलाव, पाझर कालवा, गावतलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नूतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण	०	०.००	०.००	०.००
	क) सामाजिक वनीकरण :- पडीक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना, रोपवाटीका, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड	०	०.००	०.००	०.००
	ड) वनीकरण :- वनतलाव, स.स.चर / मु.स.स.चर, ट्रेंच कम मार्केट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स, जुन्या वनतलावाचे नूतनीकरण, बांबू रोपवाटीकेची वर्तुळाकार चर, रायमुनिया / लेंटिना निर्मुलन करणे)	०	०.००	०.००	०.००
	इ) सार्वजनिक बांधकाम :- इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभुमी, पाणीपुरवठा योजनेसाठी रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण,/ नूतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण	०	०.००	०.००	०.००
	एकूण	२५९२५	६४४४४.१९	६४४.४४	१००.००

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

१क) वरील कालावधीत नियोजनाचे वार्षिक आराखडे पूर्ण झाले असल्यास जिल्हा आराखड्याचे स्वरुप नमूद करावे.

सन २०११-२०१२ (पुरवणी आराखडा)चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे -

अ.क्र.	कामाचे प्रकार	एकूण कामे संख्या	अंदाजित खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती (लाखात)	एकूण खर्चापैकी टक्केवारी
१	२	३	४	५	६
१	जलसंधारण व जलसंधारण कामे	६२१२	७१४३.१२	५६.६३	९.६५
२	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	३४२१	१४८१३.२६	३३३.५५	२०.०१
३	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	०.००	०.००	०.००	०.००
४	अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती नवीन भूधारकांकरिता इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	८९७५	१८००१.९	१०८.६६	२४.३२
५	पारंपारिक पाणीसाठ्यांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	१९१९	१२१३६.५७	३०.४३	१६.४०
६	भूविकासाची कामे	०	०	०	०.००
७	पूरनियंत्रण, पूरसंरक्षणाची कामे, वाळवंट क्षेत्रात पाऱ-पाणी कामे	०.००	०.००	०.००	०.००
८	ग्रामीण मालाची वाहतूक चोऱ्यरस्त्यांची कामे	२७४९	१६०६२.१६	४६.४३	२१.४०
	राजीव गांधी भवन	६१७	५८६८.८०	३९.४८	७.९३
९	केंद्रशासनाशी चर्चा करून राज्यशासनाने ठरविलेली कामे	०	०	०	०.००
	अ) कृषी फळपाणी कामे - माती-नालाबांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, डाळीचे बांध, कॅन्टरनेट बांध, गनराई बंधारा, जैविक बांध, गॅबियन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम मार्केट, खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, फळबंधारा	०.००	०.००	०.००	०.००
	ब) पाटबंधारे - मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, चेकडॅमतलाव, पाझर तलाव, गावतलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नूतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण	०.००	०.००	०.००	०.००
	क) सामाजिक वनीकरण - पडीक (नापीक) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना, रोपवाटीका, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड	०	०	०	०
	ड) वनीकरण - वनतलाव, स.स.चर / मु.स.स.चर, ट्रेंच कम मार्केट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, कायर लाईन वर्क्स, जुन्या वनतलावाचे नूतनीकरण, बांबू लागवडीसाठी मर्दुलाचर चर, रामनुनिया / लेंटिना निर्गुलन करणे)	०.००	०.००	०.००	०.००
	इ) सार्वजनिक बांधकाम - इतर जिल्हा रस्ते, ग्राम रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणीपुरवठा योजनेसाठी रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण,/ नूतनीकरण, रस्त्यांचे डांबरीकरण	०	०	०	०
	एकूण	२३८९३	७४०२५.८१	६४५.७८	१००.००

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

१क) वरील कालावधीत नियोजनाचे वार्षिक आराखडे पूर्ण झाले असल्यास जिल्हा आराखड्याचे स्वरुप नमूद करावे.

सन २०१२-२०१३ चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे -

अ.क्र.	कामाचे प्रकार	एकूण कामे संख्या	अंदाजित खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५	६
१	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	५२३३९	९५०६६.८७	५९०.४८	५५.००
२	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणसहित)	९३००८	३३१४६.८९	२०५.३०	१९.००
३	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	०	०	०	०
४	अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती यांना मुख्यत्वेकरुन इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	०	०	०	०
५	पारंपारिक मालमत्तेच्या योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	०	०	०	०
६	भूविकासाची कामे	०	०	०	०
७	पूरनियंत्रण, पूरसंरक्षणाची कामे, पाणथळ क्षेत्रात वृक्ष-लागवडीची कामे	०	०	०	०
